ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# हिंदु महासभा - हिंदूत्ववादी राजकीय पक्ष संघटना

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर,जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना



हिंदु महासभेचा विचार करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की हिंदूमहासभा तिच्या राजकीय, राष्ट्रीय अशा सर्वोच्च अशा वैचारिक पातळीवर पोहचविण्याचे कार्य जर कोणी केले असेल तर ते केवळ स्वा. सावरकरांनी चौदा वर्षे भयंकर करावास नि तेरा वर्षाची स्थान बद्धता भोगल्यावर वयाच्या ५४ व्या वर्षी ते अखील भारतीय राजकारणात उतरले आणि पुढे सहा वर्षे उभा भारत हिंदुत्वाच्या ध्येयासाठी असा गाजवीला की सारे सार्वजनिक जीवन ढवळून निघाले. हिंदु महासभेचे ते लागोपाठ सातवेळा अध्यक्ष म्हणून निवडून आले आणि एक राष्ट्रीय समर्थ संस्था म्हणून त्यांनी शुन्यातून हिंदु महासभा उभी केली. १९४३ डिसेंबर २५ ला अमृतसर येथे झालेल्या अधिवेशनाला ते प्रकृती अस्वास्थामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. कार्यकारी अध्यक्ष श्री शामप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाने अधिवेशन पार पाडले त्यानंतर सभेचे कार्य डॉ. मुखर्जी आणि डॉ. मुंजे यांच्याकडे आले.

राष्ट्रप्रेम अथवा देशभक्ती हा सावरकरांच्या सर्व विचाराचा केंद्रबिंदु आहे हिंदुत्व - हिंदुत्व हिंदु राष्ट्र विचार प्रणाली ही त्याचीच देणगी तिला प्रसिध्दी, प्रतिष्ठा नि राजकीय राष्ट्रीय विचार क्षेत्रातील चिरतंरणत्व प्रदान करण्याचे श्रेय त्यांचेच आहे. हिंदूमहासभाचे कार्यक्षेत्र धार्मिक, सामाजिक क्षेत्रापुरतेच मर्यादित होते. त्यासाठी पूर्वपिढीला लक्षात घेणे जरुरीचे आहे.

पंजाब केसरी लाला लजपतराय यांनी हिंदुस्थान रिव्हयू या वृतपत्रात एक लेख लिहून प्रकाशीत केला (१९०९) लागोपाठ बंगालमधील ले. कर्नल श्री उपेंद्रलाल मुखर्जी यांनी "मृत्यूशय्येवर हिंदु वंश" (A dying Race) शिर्षकाचा लेख लिहून आपली व्यथा व्यक्त केली. हिंदु समाज अगदी आडाणी, अज्ञ, उदासीन, सभोवताली काय चाललय ह्यांची साधी जाणीवही न ठेवणारा वस्तुस्थिती काय कशी आहे? आपण कोठे आहोत हे न समजून घेणारा असा समाज. ते म्हणतात.

The Mohammedians have a future and they believe in it. We Hindus have no conception of it. Time is with them, The time is aginst us, At the end of the year they want their gains we count our losses. They are growing in numbers, growing in strength gowring in wealth growing in solildarity. We are crumbling into pieces. They look forward to a united mohammdian world; we are wating for our extnction. (Indra Prakash, A brief history of Hindu Mahasbha, Page No. ११)

"इस्लामला भवितव्य असुन त्यावर त्यांची श्रद्धा व विश्वास आहे आम्हा हिंदुना याची कल्पना देखील नाही. काल त्यांना अनुकूल आहे हिंदुना तो प्रतिकूल आहे. प्रत्येक वर्षाअखेरीस ते त्यांनी काय संपादन केले ते सांगतात आम्ही आज सर्व काय हरवत चाललेलो आहोत संख्या संपती आणि एकसंघपना व बलसत्ता यामध्ये त्यांची वाढ होत आहे. आम्ही मात्र दिवसतेनदिवस विभाजीत होत चालले आहोत. मुस्लीम समाज भविष्यातील एकसंघ जागतिक इस्लामिक विश्व स्वप्न पाहतोय आम्ही मात्र आमच्या आस्तीत्वाचा शेवट पाहत आहोत."

वरील दोघांच्या विचारातून, लेखनातून प्रेरणा घेवून पहिली वहिली हिंदु परिषद (Hindu Conference) भरविण्यात आली. त्यातूनच मग पाहिली पंजाब-प्रादेशिक हिंदु महासभा Pajnab Provicial Hindusabha) अस्तीत्वात व आकारास आली (१९०९) या वर्षाला हिंदु महासभेचे ऐतिहासिक वाटचालीत तसे मोलाचे व महत्वाचे स्थान आहे. कारण याच वर्षी मोर्ले-मिंटो सुधारणाची घोषणा झाली या घोषणेद्वारेच सर्वप्रथम हिंदुस्थानच्या राष्ट्रीय राजकीय जीवनात अलगतेचे

(Seperation) नि जातीयतेचे बीजारोपण करण्यात आले. पंजाब प्रादेशिक हिंदु महासभेच्या दिल्ली संमेलनात सर शादीलाल यानी आपला अध्यक्षीय भाषणात प्रादेशिक हिंदु महासभेला अ.भा. हिंदु महासभेचे स्वरुप देण्याचा आवश्यकतेवर विशेष भर दिला ते म्हणतात "Suffice it to say that the events of the past four or five years proved beyond the shadow, no doubt that with a body that could speak with the authority of the entire Hindu community behind its books and resists the aggresive action of the Muslem League. The Hindu would not have been in plight in which they find themselves at present I appeal to the Hindu of the Pajnab to the Hindus of Hindustan to combine and consolidate the forces of the future of the country".

या त्यांच्या आव्हानाला योग्य तो प्रतिसाद लाभला. पंजाब आणि उ. प्रदेशाच्या पुढाकराने आ.भा. हिंदुमहासभेचे अस्तित्व आकारास आले. प्रारंभी केंद्रीय कार्यालय हरिद्वार येथे ठेवण्यात आले दिल्लीतील पांचतमा अधिवेशनापासून हिंदु महासभेची वार्षिक अधिवेशने नियमीत भरु लागली. थोडक्यात हिंदूमहासभा म्हणजे पंजाब प्रादेशिक हिंदूमहासभेचे विशाल व्यापक स्वरुप होय.

हिंदूमहासभेच्या रुपाने अखील भारतीय हिंदुना एक सांघीकरुप देण्याचा प्रयत्न झाला खरा परंतु तरीही धर्मातरांची चळवळ, हिंदु समाज जागृती नि संघटन यापुरतेच मर्यादीत कार्यक्षेत्र होते विलगता वाद व जातीवादाचे बीज पेरले गेले होतेच मुस्लीम लीगचा जन्म १९०६ झालेला होता. गांधीचा हिंदुस्थानच्या राजकीय क्षितीजावर उदय झालेला होता. त्यांनी असहकारांचे आंदोलन आरंभीले होते त्यासाठी मुस्लीमाचे साह्य लागावे म्हणून खिलाफतीचा आफत ओढावून इस्लामी धर्माधतेला उघडपणे खतपाणी पुरवले. त्यातून मोपत्याचे अत्याचार, आक्रमणे आंतकी कृत्ये नि शांकांतिक सारखे प्रकरण एका पाठोपाठ घडत गेली या सर्व घडामोडी म्हणजे इस्लामी विस्तारवाद आणि आक्रमणे यांच्या जीवंत साक्षी होत्या. थोडक्यात मं. गांधीचा आणि कॉंग्रेसचा वाढता मुसलमान अनूनय आणि मुसलमानाची वाढती फूटीर व मुजोर वृत्ती याची एक स्वाभाविक प्रतिक्रीया म्हणजे सावकराचा हिंदु राष्ट्रवाद.

कॉंग्रेस स्थापनेनंतर (१९०८) तीनच वर्षानी सर सय्यद महंमद यांनी आपल्या मेरठ येथील व्याख्यानांत मुसलमान मानसिकता व्यक्त केली. Now supoose all the English were to leave India then who were the rulers of India? It is possible that under those curcumstences two nationals Mohmmeduns and Hindu could seat on the same throne and reamin equal power most certainly not it is necessary that one should conquer the other and thrust it down to hope that both could remin equal is to desire the possible and inconceivable.

(R.S. Mujumdar-British Parliamentary and Indian Renaissance ३०९)

हिंदु-मुसलमान केवळ परस्पर विरुद्ध राष्ट्रे नाहीत तर युद्धमान शत्रुराष्ट्रे आहेत, ही इस्लामी आक्रमकता ती अलगता अगदी स्पष्ट करणारी आहेत.

वरील तीनही आक्रमणे (मोपला-मुलतान-कोहळ) यातून हिंदू च्या आस्तीत्वाचा प्रश्न निर्माण झाला. प्रत्येक शिरगीणतीत एकंदर लोकसंख्येतील हिंदुचे प्रमाण कमी कमी होत होते मुसलमान हिंदुस्थानावर राज्य करण्याची स्वप्ने पाहत होते आणि मध्यवर्ती मंत्रीमंडळात त्यांनी १९४६ साली हिंदुशी बरोबरी साधली होती. त्यातुन पुढे हिंदुस्थानची फाळणी होवून पाक निर्माण झाले. हा इतिहास आहे. हिंदु हिताला जपणारा कोणी वजनदार मनूष्य उरला नव्हता मोपल्यांचा शुर व दानविर म्हणणारा स्वामी श्रद्धानंराना ठार करणाऱ्या खुनी माणसाला भाई म्हणणारे नि अफगाणी अमीर हिंदुस्थानावर आक्रमण करुन आला तरी त्यांचे स्वागत करु पाहणारे म. गांधी देशाचे पुढारीपण चालवीत होते.

खिलाफत चळवळ जातीय होती धार्मिक होती आणि देशबाह्य (Extra Teritorial) होती. गांधीनी ती आपली मानली व खिलाफतीच्या प्रश्नापुढे स्वराज्याच्याप्रश्न गौण मानला (१९२०-२१) (Young India)

अफगानीस्थानच्या अमीराला हिंदुस्थानावर आक्रमण करण्यासाठी समर्थन देण्यात गांधीचा सहभाग होता (यंग इंडीया ४.५.२१)

मलबार मधील मुसलमान, सोपल्यांनी बंड करून त्यात हजारो हिंदुच्या कत्तली केल्या, हजारो हिंदूना सक्तीने बाटविले, अनेक हिंदु स्त्रियां भ्रष्ट केल्या, हिंदु देवळे भुईसपाट केले. जेव्हा अब्दुल रशीदने श्रद्धांनंदाची हत्या केली तेव्हा त्या हत्यारी अब्दूल रशीदला म. गांधीनी भाई म्हटले आणि मुसलमान माझे रक्त भाऊ आहेत असे रक्ताचे नाते सांगीतले. (१९२७.) या मोपल्यांना Brave god fearing Mapaleo असे गांधीने म्हटले. (धनजंय कीर - १६१-१७५).

आर्य समाजी नेते लाला नानकचंद यांची हत्या झाली. रंगीला रसूल लिहिणाऱ्या राजपालला इलामदिनने १९२९ मध्ये भोसकले. १९३४ साली नथुलाल शर्माला भर न्यायालयात भोसकून ठार मारण्यात आले. या खून सत्राची यादी फार

मोठी आहे. ज्या काळात हिंदु मुस्लीम ऐक्याचा विचार राजकीय व्यासपीठावरून मांडला जात होता त्या काळातील या सर्व घटना आहेत. मुस्लीम नेतृत्वाने या खून सत्राचा निषेध तर व्यक्त केला नाहीच उलट त्यांना स्वर्ग प्राप्ती होण्यासाठी या मरहूम व्यक्तीना अ अला ए एलियन मध्ये सर्वशक्तीमान इश्वराने प्रवेश द्यावा या साठी कुराणच्या लाखो आयतीचे पठण केले. गांधीनी मुसलमानाच्या या गुन्हेगारीवृत्तीचा चक्क शब्दांत निषेध व्यक्त केला नाही.

गांधीच्या जातीय प्रश्नाच्या सोडवणुकीच्या पद्धती संबंधी डॉ. आंबेडकरांनी लिहिले आहे.

"गांधीनी हिंदु मुस्लीम प्रश्न सोडविण्यासाठी मुसलमाना कोरा चेक दिला. या कोऱ्या चेकचा परिणाम मुसलमानाना अधिक भडकविण्यात झाला. मुसलमानानी गांधीच्या या कृतीचा अर्थ टाळाटाळ असाच लावला.

सावरकराचा हिंदु राष्ट्रवाद हिंदु समाजाला एकजीव व विजूगीषू होत. सकल हिंदु बंधू ही भावना त्यात होती. मुसलमानाच्या देशद्रोही व अलगतावादी वृत्तीचा आविष्कार मुस्लीम लीगच्या लखनौ अधिवेशनात प्रकट झाले उर्दू ही मातृभाषा व्हावी, वंदेमातरमला विरोध केला. (ना. फझलुल हक).

अ-२

गांधींनी पाकिस्तान ऐवजी हिदु-मुस्लीम ऐक्याचा जो पर्याय सर्वत्र पुढे ठेवलेला होता तो यशस्वी होणे शक्यच नव्हते. कारण या दोघांचेही धर्म, संस्कृती आणि भाषा यांचे आग्रह एकमेकासी पोषक नव्हते. त्यांच्यात सामाजीक ऐक्य निर्माण होण्याची शक्यताच नव्हती.

गांधींच्या या पर्यायापद्दल डॉ. आंबेडकर लिहीतात-

सामाजिक ऐक्या शिवाय राजकीय ऐक्य प्राप्त करता येत नव्हते, आणि ते प्राप्त केले तरी ते उन्हाळ्यातील वाऱ्याच्या झुळुकीसारखे अनिश्चित असते. विरोधी वाऱ्याच्या माऱ्यामुळे ते उध्वस्त होत असते. केवळ राजकीय ऐक्य साधल्याने भारत एक राज्य बनु शकेल. परंतु राज्यम्हणजे राष्ट्र नव्हे. जे राज्य राष्ट्र नसते ते स्वतःच्या अस्तित्वाच्या संघर्षात टिकत नसते.

Ambedkar-Pakistam उक्त पृष्ठ १८५

कर्णावती अधिवेशनात सावरकर म्हणतात तुम्ही जर बंगालमधील हिंदुना संबोधले तर लक्षात ठेवा तुमच्या भाई बंदना महाराष्ट्रात व इतरत्र मापास माप करुन नव्हे मापाला शीग लावून नि माप हलवून भरुन आम्ही उणीव भरून काढूत.

सावरकर मुस्लीमांच्या खुनशी वृत्ती विषयी सजग होते. गांधींच्या अहिंसावादी धोरणाविषयी आणि मुस्लीमांप्रती असणारा त्यांचा मानवतावादी दृष्टीकोन सावरकरांना मान्य होणारा नव्हता म्हणुन मुस्लीमांबाबत शठं प्रति शठं धोरण ते स्विकारल्याचे दिसते. १९३७ साली कर्णावती येथे हिंदु महासभेचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनांत मुस्लीमांच्या जातीय आणि हिंसावादी भडकपणाला त्यांनी उत्तर दिले.

रत्नागीरी येथील वास्तव्यात स्वा.सावरकरांनी सामाजिक सुधारणेचा वसा स्विकारला आाि सहभोजन, हळदीकुंकु समारंभ आणि सामुहिक सहभोजने असे कार्यक्रम राबविले, अस्पृश्याच्या मंदीर प्रवेशाबाबत पतित पावन मंदीराची उभारणी करून जो मार्ग अनुसरला त्या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात. अस्पृश्यांसाठी वेगळी मंदीरे बांधण्याची कल्पना शुध्द पोरकट पणाची होती. हिंदुसभेची स्वतंत्र देऊळ उभे करण्याची कल्पना हास्यास्पद होती. डॉ. दिनकर हेरळेकर म्हणतात सावरकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र असे पतितपावन मंदीर बांधले ही गोष्ट अत्यंत विचीत्र होती. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात- हिंदुमहासभेने वेगळे नवे मंदीर बांधुन देण्याचा अस्पृश्यता निवारणाचा केलेला प्रयोग फोल व फसवा होता असे म्हंटले पाहिजे.

१९३७ पर्यंत हिंदुमहासभा धार्मिक सामाजिक आघाडी म्हणुनच कार्यरत होती. महासभेची अधिवेशने सुध्दा काँग्रेस समवेतच भरत असत. काँग्रेस राजकीय अघाडी तर महासभा धार्मिक-सामाजिक आघाडी. याच बेळगावच्या अधिवेशनात राजकीय विचार करण्याचा ठराव चर्चेस मांडला गेला. ठरावाचे प्रभावी समर्थन करताना दक्षीणेकडील नेते एस.सत्यमुर्ती यांनी स्पष्ट विचार दिशा देत म्हंटले की, It was for the tirst time (This Resolution) giving a defined orientation of the activies of (Hind Maha Sabha.) which could not only the confiened to social and religions up lift of the Hindu but would also focus and express Hindu opinion on political prolems. (A Brief History of H.M.s. २४)

पं. मदनमोहन मलवीय, डॉ.बा.शि. मुंजे, भाई परमानंद, लाल लजपतराय नि स्वामी श्रध्दानंद सारखी काँग्रेसची नेते मंडळी हिंदू महासभेत अधिक प्रभावीपणे कार्यरत राहीली परंतु हिं.म.स. ला स्वतंत्र अशी राजकीय दृष्टीनी इतिहास सिध्द राजकीय-राष्ट्रीय विार प्रणाली सैध्दांतीक स्वरूपात लाभली ती सावरकरांच्या नेतृत्वाखालीच स्वा. सावरकर हे एकमेव असे नेते होते की जे अगदी प्रारंभापासुन काँग्रेसी राजकारणापासुन अलीप्त होते. महर्षी अरविदांच्या शब्दात सांगायचे तर काँग्रेसच्या प्रार्थना (Prayer) याचना (Petition) नि निषेध (Protest) असल्या प्रकारच्या ध्येय धोरणाने प्रभावीत झाले

नाहीत. कारण त्यांच्या लेखी हे असले ध्येय धोरण स्वातंत्र्य संपादनाच्या दृष्टीने अगदीच कुचकामी नसले तरी परिणाम शुन्य होते असल्या धोरणाने इंग्रजाच्या औदर्यानूसार प्रशासनात काही सुधारणा घडून येतील (Source Adminstration referoms) काही प्रशासकीय पदे पदरात पडतील परंतु सुधारणा करणारी पदे निर्माण करण्याचा नि प्रदान करण्याचा जो मुलभूत अधिकार म्हणजे स्वातंत्र्य ते कदापी मिळणार नाही असे सावरकरांची ठाम भूमिका होती.

स्वांतत्र्य संपादनासाठी सशस्त्र संघटीत संघर्ष हाच परिणामकारक उपाय ही त्याची ठाम विचारधारा होती त्याचा संपूर्ण प्रवास-प्रयत्न त्यांच दिशेने घडला. गुप्त संघटन, शस्त्र, शिक्षण, सशस्त्र सैनिकासह गुप्तपणे प्रसार, प्रचार, परराष्ट्र शत्रु-मित्र संबंध नि अंतिमताः ब्रिटीश साम्राज्य जागतिक युद्धाच्या वनव्यात गवसले असताना प्रत्यक्ष सैनिक उठाव (Armed Rebellion) या त्यांच्या राज्यक्रांतीच्या विविध आघाडी होत्या. सावरकराच्या मते रक्तहीन राज्यक्रांती (Bloodless Revolution) अहिंसक स्वातंत्र्यप्राप्ती, Non-violent Independence इ. मं. गांधीचा व कॉंग्रेसची राजकर्त्यांचा प्रचार म्हणजे निव्वळ बकवास, धांदात थोंताड आहे. एखादी गोष्ट प्रदीर्घ काळपर्यंत सातत्याने नि वारंवार कानावर आदळत ठेवून असंभव व असत्य ही विश्वास पात्र करता येते हे गौबेलीयन धोरण कॉंग्रेसने सतत उपयोगात आणले त्या संदर्भात लीडल हार्ट म्हणतो की, True History is always attending to those whohave interest in concealing it-------- official history is therefore never reliable सत्य राजकर्त्यांना नेहमीच उपमर्द कारक वाटते. अधिकृत इतिहास म्हणून विश्वसनिय ठरत नाही. सत्य झाकुन दडपुन ठेवता येत नाही.

कॉंग्रेसी प्रचार धांदात खोटा ठरवणारी स्वीकृती ब्रिटीश प्रधानमंत्री ॲटलीने भर संसदेत दिली Britain is transferring power, due to the fact १) Indian army is not longer loyal to Britain २) and we can not afford to have larger army to hold down India (स.सा.व खंड-८ ८४८)

म्हणूनच खुप गाजा वाजा करण्यात आलेल्या १९४२ च्या आंदोलनाची संभावना अटतीने दुर्लक्षणीय (Negligible) ह्याच शब्दांत केली तर सावरकरांनी ही छोडो भारत चळवळ तोडो भारत मध्ये परावर्तीत होण्याची भिती कल केली Let not this quit India end in split India.

स्वा. सावरकरांनी रत्नागिरीच्या स्थानबद्देतून पुर्णता मुक्त झाल्यानंतर हि.म.स. अध्यक्षपदांचा स्विकार केला व महासभेच्या मंचावरुन त्यांनी आपली सैनिकी संघर्षाची भूमीका वळवली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ते म्हणतात The future of India does not lie in the lap of Mr. Curchil but lies in the lap of war gods

याच दृष्टीने विचार करीत असताना सावरकर-सुभाषचंद्र यांची भेट सावरकर सदनात २२. जानेवारी १९४० मधे घडून आली. कॉंग्रेसमधून काढून टाकण्यात आलेल्या या तरुण तडफदार व तेजस्वी नेत्यावर सावकराचा विश्वास होता (स.सा.वा खं ८, ४७१) जपानमध्ये वास्तव्य करत असणाऱ्या रासबिहारी बोस ह्या प्रसिद्ध क्रांतीकारकाच्या कार्यकर्तत्वाची साक्ष देत सावरकरांनी सैनिकी संघर्षाचा विचार मांडला. लवकरच कॉंग्रेसी सुभाषचंद्र सावरकरी नेताजी सुभाष झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सावरकर उघडपणे सैनिककिरणाचा प्रसार करीत होते. तरुणानो सैन्यात भरती व्हा हे त्यांचे आवाहन होते.

ह्याच संदर्भात जे.सी. ओहसवा The Great Indian in Japan या ग्रंथात वर्णन करतात The chief of the Indian National Army Rasbhihari Bose proceeding alone to the front line and talked to the Indian officers and soldiers in the British Army not to be false to their love of India and independence of India in strong heart-stirring words. Miracle accomplished। savarkars Militeriseation policy in woorld war II began to absorb these Indians soldiers in I. N. A. and officers developed in to formbale force of 50000. Rasbhihari bose become supreomoe commandant of this Army.

सुभाषबाबुनी सैनिकी सुत्रे हाती घेऊन सिंगापुर नभोवानी वरुन जे वक्तव्य केले ते सावरकरी नेतृत्वाच्या हिंदु सभेच्या कार्यावर प्रकाशझोत टाकते When due to misguided politician oshim and lack of vision almost all the leaders of congres party have ben decrying all the soldiers in Indians army as mercenanes, it is heartening to note that veer savarker is seriously exhorting the youth of India to enlist in the arm forces, these enlisted youth themselves provide us trained men and soldiers to our INA (Singaore war Radio speech Jun २५, १९४४)

देशाचे स्वातंत्र्य स्वा. सावरकराचा दिव्य दुर दृष्टीला स्पष्ट दिसत होते. ते अटल होते. परंतू त्या काळात त्यांनी ही छोडो भारत तोडो भारत ठरण्याची भय सूचनाही दिली होती. कारण देशाचे स्वत्व कॉंग्रेसी मुस्लीम तुष्टीकरणाचा धोरणाने भंग होऊ पाहत होते. सर्वधर्मपंथाचे तत्वे उत्तामांश मिसळून उदयास येणाऱ्या इंद्रधनूष्यी मनोहर हिंदी राष्ट्राला सावकराचा विरोध नव्हता (स.सा.वा २९-४-१९४६) हि.म.स.चे नेतृत्व स्विकारल्यानंतरही त्यांनी हाच विचार हिच भावना

व्यक्त केली. परंतू इस्लाम धर्माचे आक्रमक पावले त्यांनी फुटीर, मुजोर व अराष्ट्रीय प्रवृत्ती नि कॉंग्रेसची आरंभापासूनची पडखाऊ नीती, तुष्टीकरणाचे धोरण त्याची परिणीती अंतीमता देश विच्छेदनात होणाच्या संभव ओळखूनच त्यांनी आपला १९३७ कर्णावर्ताच्या अध्यक्षीय भाषणात ही वस्तुस्थीती कॉंग्रेसी नेत्यांचा व हिंदु जगताच्या निदर्शनास आणली. As it is, there are two antagonistics nations living side by side in India. Several infantile politician commit the serious mistake in supposing that India is already welded in to a harmonious nation or that it could he welded for the mere wish to do so, these our well meaning but unthinking freinds take their dreams for relations- it is super to diagnose and treat the deep rooted disease than to ignore it (स.सा.वा.खंड ६, २९६).

कॉंग्रेसी नेते मंडळीना त्याच्या वैचारिक भ्रमातून जागे करण्याचा प्रयत्न सावरकरांनी हिंदू महासभेच्या व्यासपिठावरून सन १९३७ सर्वप्रथम केला. परंतू स्वप्नवत सत्य समजुन वर्तन करणा-या अव्यहारी नेत्याना ते कळु शकले नाही. उलट कॉग्रेसी हितचितंकानी सावरकरांवर हिंदी राष्ट्रवाद विचाराचा आरोप लावण्यास प्रारंभ केला. मोठा गदारोळ उठवुन वादळ माजविणे पुन्हा गोबेलिअन प्रचारतंत्राचा वापर केला. वास्तविक सावरकरांना हिंदी राष्ट्रवाद विचाराला मुळीच विरोध नव्हता. त्या विचारांचे त्यांनी एक उदात्त व आदर्श म्हणून स्वागत केले. परंतू त्यांना निर्मळ हिंदी राष्ट्र हवे होते, ज्यात कोणीही हिंदू नाही, वा मुसलमान नाही. ना कोणी ख्रिस्ती ना यहुदी ना पारसी. यात सर्व एकच केवळ हिंदी.

परंतु हिदी होण्यालाच मुसलमानाचा विरोध होता. कारण त्यात त्यांच्या मुसलमानीपणाचा विलय अभिप्रेत होता आणि हे त्यांच्या इस्लाम घटीत मानसिकतेला मान्य होण्यासारखे नव्हते. ते आरंभापासून मुसलमान कॉग्रेसपासून अलिप्त राहत, फटकून वागत. त्यांची ही मानसिकताच असहकाराच्या मुळाशी होती अशी कबुली सुरेद्रनाथ बॅनर्जी आपल्या चरित्रात देतात. त्यांची अलिप्तता, विलगता (Separatist Tendency) असहकारात असहकार विरोधात विरोध चढत्या कमाने त्यांच्या शत्रुत्वास परिनीती होत होती त्याचाच परिणाम पाकिस्तानच्या मागणीत झाला.

मुसलमानांची इस्लामी मानसिकता त्यानुसार त्यांनी जोपासलेली, जपलेली विलगतेची भावना त्या दिशेने त्यांनी लावून धरलेली स्वतंत्र निवास भूमीची मागणी. सुरेद्रनाथ बॅनर्जीपासून गांधी पर्यन्तची कॉग्रेसची चढत्या तुष्टीकरणाची औदार्याची नीती (Policy of apeacement) लक्षात घेऊनच सावरकरांनी हिदु महासभेच्या अध्यक्षीय कारकिर्दीत त्यावरुनच झंझावती रान उठविले. विलगतेच्या भावनेपोटी स्वतंत्र राष्ट्र पाकिस्थानच्या (National Home) मागणीच्या मुळावरच घाव - मुले कुठार घालण्यासाठीच सावरकरांनी हिंदुत्व, हिंदु राष्ट्र विचारांची ऐतिहासीक सैध्दांतीक मांडणी केली. आपल्या मुळ व मुख्य भूमिकेला अनुसरुन अंदमानच्या कारावासातच त्यांनी हिंदुत्वाची सुत्रबध्द मांडणी केली.

रत्नागिरी स्थानबध्दतेच्या काळात त्यांनी १९२३ साली (Essentials of Hindutva) हा ग्रंथ प्रकाशित केला. १८५७ मध्ये पहिले स्वातंत्र्य समर, जोसेफ मॅझीनी सारखे ग्रंथ मराठीतून लिहणा-या सावरकरांनी हिंदुत्व हा ग्रंथ मात्र इंग्रजीतून लिहला कारण त्यांच्या डोळयापुढे अखील हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व होते. हिंदुचे सत्व निसत्व म्हणजे हिंदुत्व तेच देशाचे राष्ट्राचे राष्ट्रीयत्व. राष्ट्राचे सर्व मर्म ध्यानात बाळगुन त्यांनी थेट वेद काळापासून हिंदुस्थानच्या इतिहासाची पाहणी केली होती आणि हिंदुस्थानात हिंदुचे राष्ट्र आहे असा सिध्दांत मांडला. भुगोलाने रेखून दिलेली एक सलग वास्तव्य भुमी, रक्ताच्या नात्याने बांधलेली एक जाती (Race) सर्व धर्म संप्रदायाचे समान उगमस्थान असणारी एक पुण्यभूमी, वास्तव्य भुमी आणि पुण्यभुमी यांच्य एकत्व, प्रदीर्घ आणि उज्वल इतिहास, संख्या बळ इ. गुणविशेषामुळे हिंदुमध्ये एक वैभवसंपन्न राष्ट्र होण्याची बीजगुण आहेत (Hindutva, १७० to १७८) सावरकर जमिनीच्या तुकडयाला राष्ट्र समजत नव्हते किंवा राज्याला (State) राष्ट्र मानीत नव्हते किंवा शासनालाही (Government) राष्ट्र मानीत नव्हते त्यांची राष्ट्रकल्पना प्रदेशविशिष्ट किंवा राज्यविशिष्ट असण्याऐवजी समाजसमुह विशिष्ट नि संस्कृती विशिष्ट होती. (Darshan,४५). सावरकरांच्या हिंदुत्वात हिंदु हेच राष्ट्रीय होते. अहिंदुना त्यांनी केव्हाही राष्ट्र म्हटले नाही. There are two nations in the main, The Hinds & Muslims in India (Darshan २४) असे त्यांनी म्हटले परंतु हिंदुस्थानात अहिंदुना मुळी स्थान नाही असेही त्यांनी कधी म्हटले नाही. पूर्वीच्या राष्ट्रसंघाने अल्पसंख्यांक म्हणून मान्य केलेले अधिकार ते अहिंदुना देणारे होते. हिंदुस्थानात हिंदु हेच राष्ट्र असले तरी जेथे जे State हिंदी राज्य आहे त्यांचे हिंदुप्रमाणे सर्व अहिंदू समान नागरिक असतील (Darshan १७-१८) मुक्ती दिन साजरा करुन हिंदुस्थानभर दंगे पेटविण्या-या मुस्लीम लीगला कलकत्याच्या हिंदु महासभेच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी ठणकावून सांगितले की if you come, with you, if you do not, without you and if you oppose, inspite of you, we shall continue the good fight to free our Hindustan as best as we can (Darshan १०६).

त्यांचा विरोध मुसलमानाच्या अडवणूकीच्या धोरणाला होता. त्या धोरणाला बळी पडून त्यांचा अनुनय करणा-या कॉग्रेस व म. गांधीना होता. मुसलमानांना वेगळे मतदारसंघ दयावेत, कोरे चेक व विशेष अधिकार दयावेत, लोकसंख्येच्या

प्रमाणात त्यांना जे लाभ न्यायतः मिळण्यासारखे आहेत, त्याहून अधिक लाभ त्यांच्या पदरात टाकावेत, सैन्यात आरक्षण, मुलकी नोक-यात त्यांची जादा भरती होवू दयावी, मंत्रीमंडळात त्यांचा वरचढपणा सहन करावा आणि स्वातंत्र्य लढयात ते सहभागी होतील म्हणून आशाळभुतपणे त्यांच्या तोंडाकडे बघत बसावे हे त्यांना मान्य नव्हते. या भोगंळ सौदेबाजीमुळे मुसलमान शेफारतील ही त्यांची फुटीर वृत्ती कमी होण्याऐवजी वाढीस लागेल परंतू सावरकराच्या या भूमिकेकडे कॉग्रेसने व गांधीने दूर्लक्ष केले आणि सावरकर अहिंदूना हिंदूस्थानातुन हुसकू पाहतात अशी खोटी आवई उठवली.

सावरकरांचा हिंदुत्ववाद अध्यात्मिक किंवा पारमार्थिक नव्हता तो अगदी ऐहिक होता. ते इहवादी दृष्टीने व त्यातही ते समाजशास्त्रीय दृष्टीने पाहत होते. हिंदू धर्म हा त्यांच्या हिंदूत्वातील एक घटक होता. एकमेव घटक नव्हता. ते हिंदू धर्मावरून हिंदू कोण ठरवीत नव्हते तर हिंदूचा जो धर्म तो हिंदू धर्म म्हणत होते. हिंदूमध्ये जे विशीष्ट धर्मसंप्रदाय प्रचलीत आहेत त्यातुन जर काही सुसंगत धर्म विचारधारा निघत असेल तो हिंदू धर्म होय. Hindutva means the system of Religion found common amongst the Hind people (Hindutva १३०) थोडक्यात हिंदू धर्म नामक एक धर्म नसून तो अनेक धर्माचा समूह आहे. मुळात हिंदू धर्म सहिष्णू धर्म आहे. ग्राहयत्तम धर्म म्हणून हिंदू धर्माचा अभिमान आहे, परंतू हिंदू धर्माविषयी ऐकातिंक श्रध्दा नसल्यामुळे धर्माला जो कडवेपणा व अतिरेकीपणा कोणत्याही समाज समूहाला (मुस्लीम, ख्रिश्चन) येतो जो हिंदू समाजात नाही.

इंग्रजीतून लिहलेला Hindutva हा ग्रंथ नागपुरला प्रथम मराठीतुन अेक मराठा हया नांवाखाली प्रकाशित झाला. हिंदूविषयक त्याची सुप्रसिध्द व प्रतिष्ठाप्राप्त व्याख्या हया मुळ ग्रंथात प्रसिध्द झाली. हिंदूत्वाकडे बघण्याची त्यांची दृष्टी समाजशास्त्रीय होती. आणी तिच्या व राजकीय दूरदर्शीपणा होता, त्यामुळेच त्यांनी हिंदूत्वाच्या व्याख्येची मदार हिंदू धर्मावर ठेवली नाही. त्यांना हिंदूचे राजकारण अभिप्रेत होते. तेव्हा हिंदूचा समुह लहान होईल असे आपल्या व्याख्येने त्याने कोणतेही निमीत्त दिले नाही. किंबहूना हिंदू समुह अधिकाधीक मोठा होईल याची दक्षता घेतली शीख किंवा नवबौध्द सावरकरांच्या व्याख्येप्रमाणे १९२३ पूर्वीच हिंदु ठरवले होते सावरकरांच्या व्याख्येपूर्वी हिंदुत्वाच्या निदान शंभरतरी व्याख्या होत्या. असे नटेशन आणि कंपनी ने प्रसिध्द केलेल्या पुस्तकावरुन दिसते (Keer ४३५) परंतु सावरकरांच्या व्याख्येने या सर्व व्याख्यांना मागे टाकले कारण तिच्यात वास्तवाचा अचूक वेध घेणारी समाजशास्त्रीय दृष्टींनी राजकीय शहाणपण याचा उत्कृष्ट समन्वय झाला होता.

असिंधु- सिंधूपर्यन्ता यस्य भारतभुमिका
पितृभूः पुण्यभू श्चैव स वै हिंदुरितीस्मृतः

या त्यांच्या व्याख्येप्रमाणे सिंधूपासून सागरापर्यन्त विस्तारलेली भारतभूमी ज्यांची पितृभू म्हणजेज पूर्वजांची भूमी आहे. आणि त्यांची पूण्यभू म्हणजे धर्माची आणि धर्मपुरुषाची किंवा संस्कृतीची पवित्र अभिमान विषयाची भूमी आहे तो हिंदू होय. म्हणजे ख्रिश्चन, मुसलमान, पारशी, ज्यू हिंदुत्वातून वगळली जातात आणि सनातनी नी शीख, जैन की लिंगायत, आस्तीक की नास्तीक नी आज्ञेयवादी भारतीय, शैव की वैष्णव, महानुभाव नी भागवत, आर्यसमाजी, प्रार्थनासमाजी नी ब्रम्होसमाजी सगळे सगळे हिंदू ठरले. नवबौध्दही आपल्या जन्मापूर्वीच हिंदू ठरत गेले. हिंदु संघटनेचे एवढे उत्तुंग कार्य सावरकरांच्य या दोन्ही ओळींच्या या व्याख्येने केले आहे. म्हणून हुतात्मा स्वामी श्रध्दानंद या व्याख्येनंतर स्वतःला आर्य न म्हणवता हिंदु म्हणवून घेऊ लागले (हिंदुत्व प्रस्तावना ५).

हिंदूना राष्ट्र मानना-या सावरकरांनी राष्ट्रबल वर्चस्वासाठी हिंदुंच्या संघटनेकडे लक्ष घातले त्यासाठी हिंदूंना खंड विखंड करणा-या जातीभेदाच्या उन्मुलनासाठी कार्य केले. त्यासाठीच त्यांनी वेदोत्कबंदी, व्यवसायबंदी , स्पर्शबंदी, सिंधूबंदी, शुध्दीबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी या सात शृंखला तोडून हिंदू समाजाने स्वतंत्र झाले पाहिजे. सावरकरांनी हिंदूमधील श्रुती-स्मृती - पुराणोक्त प्रवृत्तीचा निषेध केला, गाईला उपयुक्त पशु म्हटले सद्यकाळीने परिस्थितीत यज्ञ म्हणजे उपयुक्त द्रव्याची निरर्थक होळी अशी संभावणा केली. भाबडया व्रतवैकल्यांची रेवडी उडवली. जे राष्ट्र हितास उपयुक्त त्याचा स्विकार त्यांनी केला त्यात गोपुजन नव्हे तर गोपालन मान्य केले. थोडक्यात त्यांचा हिंदुत्ववाद विज्ञानाभिमुख व पुरोगामी व अद्यावत होता.

जगात विविध देशात बहुसंख्य लोकगट व समाज राष्ट्र संज्ञा संकल्पनेचा अधिकारी ठरतो म्हणून हिंदुस्थानात हिंदु हाच राष्ट्रसंज्ञेस पात्र आहे जसे The Germens are the nation in Germeny & the Jews a community the Turks are the nation in the Turkey & Arabs or the Armericans a Minority Community even so Hindus are the nation in India. The Muslims a minority community (तत्रैव ३२४).

अशाप्रकारे ऐतिहासिक नि जागतिक मान्यतेच्या निकषावर सावरकर हिंदु महासभा स्विकृत हिंदुत्व - हिंदुराष्ट्रविषयक भूमिका विषद करतात. १९४५-४६ च्या सत्तांतर पूर्व निवडणुक काळात जिवाच्या आकांताने सावरकर

म्हणतात की Vote for Congress is a vote for Pakistan कॉंग्रेसला मत म्हणजे पाकिस्तानला मत देणे ठरेल. अशी भीषण भवितव्याची भयसुचना हिंदुजनांना दिली त्यांच्या प्रभावी प्रचाराने हिंदु जगतात हलचल झाली परंतु सजग झालेले कॉंग्रेसी नेते त्यांनी आश्वासनांची, अभिवचनांची, प्रतिज्ञांची नुसती बरसात केली. नेहरुनी आश्वासक शब्दांत वचन दिले. वल्लभभाईनी या लोहपुरुषांनी Sword will meet the Sword, let there be a civil war ची भाषा उच्चारली. गांधीनी त्यांच्या महात्मेपणाला शोभेल अशी देशाची फाळणी माझ्या देहावरुन over my dead body अशी मायावी प्रतिज्ञा केली. हिंदू भोळेभाबडे, त्यांनी त्यावर विश्वास टाकला. भरमसाठ मते कॉंग्रेसच्या पारडयात टाकली सत्तासुत्रे हाती येताच कॉंग्रेसने सर्व वचने गिळली. आश्वासनाला हरताळ फासला. अहिंसावादी गांधीच्या कॉंग्रेसने रक्तलांच्छीत फाळणीचा स्विकार केला, धर्मांधापुढे लोटांगण घातले. हिंदुसभेवर जातीयवादाचा आरोप करीत जातीयवादी मागणी मान्य केली. त्यानंतरही धनंजय गाडगीळासारख्या राजकारणातील व्यक्तीची खंडीत भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्यात यावे ही वास्तव सुचना परत अव्हेरली, झिडकारली.

स्वातंत्र्योत्तर काळात कॉंग्रेसला धास्ती होती ती केवळ हिंदू महासभेची कारण ती कॉंग्रेसची एकमेव स्पर्धक होती. निवडणुकीत पराभूतच नव्हे तर भुईसपाट झालेली असतानाच तीची विचारप्रणाली, भाकिते, सिंध्दांत अक्षरशा खरी ठरली होती. नेहरुंनी नेमकी खबरदारी घेवून सावरकरांना गांधी हत्या अभियोगात गोवले कारण ते हिंदु महासभेचे सर्वेसर्वा, तत्वज्ञ होते. नेहरुंनी असली क्रुरनिती अवलंबिली खरी परंतु महासभा संपली नाही. खटल्यातून सावरकरांची निर्दोष सुटका झाली. त्यांनी पूनश्च हरीओमच्या ध्येयाने कलकत्ता अधिवेशन एक धक्का और दो पाकिस्तानको तोड दो ची संजविक घोषणा दिली. स्वातंत्र्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत (१९५२) महासभेचे चार नेते बॅ. निर्मलचंद्र चटर्जी, प्रा. वि. घ. देशपांडे, डॉ. ना. मा. खरे आणि श्रीमती शकुंतला नायर लोकसभेवर निवडून गेले. स्वतंत्र भारतात महात्मा गांधी हत्येचे राजकीय भांडवल करीत शॉर्ट टर्म गेनसाठी पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली. (१९४८) परंतु वल्लभभाईनी ती बंदी उठवली कारण कॉंग्रेसमध्ये वल्लभभाई The only maha subhait in the congress म्हणून ओळखले जात असत. डॉ. शामाप्रसाद मुखर्जीचा उल्लेख हिंदु महासभेच्या वर्तुळात कॉंग्रेसची बटीक Hand made of congress करणारा अध्यक्ष असाच होत होता. त्यांनी हिंदुमहासभेचे त्यागपत्र देवून पूर्णतः मुक्तता मिळवली. अर्थातच स्वातंत्रोत्तर नवीन आपत्तीमुळे आपली अशी राजकीय आघाडी असावी अशी आवश्यकता आरएसएसला जाणवली. डॉ. शामाप्रसादांना संघटनेचे बळ हवे होते, तर संघाला त्यांच्यासारखा अखिल भारतीय नेता लागणार होता असा समायोग जुळुन येऊन जनसंघाचा जन्म झाला. (२१/१०/१९५१).

जनसंघाचे संस्थापक नेते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भुसीतुन तयार झालेले होते.(पं. दिनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, नानाजी देशमुख आदी) म्हणून जनसंघाची आरंभापासूनची जनमानसातील प्रतिमा राहिली ती सौम्य अशी एक हिंदुत्ववादी पक्ष म्हणून, अर्थात भारतीय जनसंघ पक्षाचे धोरण हिंदु अहिंदुना मुक्तव्दार प्रवेशाचे होते. अर्थात हिंदु महासभा हिंदुंचीच संघटना होती त्यात आर्थिक व राजकीय कोणत्याही कारणास्तव अहिंदुना हिंदु महासभेत प्रवेश देणे सावरकरांना मुळीच मान्य नव्हते. कारण ते हिंदु हिताला मारक ठरणारे आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या लेखी हिंदुची हिंदु महा सभा म्हणजे शिवालय त्याचे पावित्र्य आणि हिंदुशिवाची सुरक्षितता त्यांना सर्वाधिक मोलाची होती The Hindu mahasabha is a worship where hindus alone can go to worship there national hindus shiva let us not turn into mandir the masgid or bazaar by such an error. The Hindu would loose their self by those very steps in which the congress degenerated in to a chaos (S.S. Surkar & G.N. Joshi , Historic statements - २०७).

भारतीय जनसंघ सर्वसमावेशक, सर्व धर्मपंथ, प्रदेश, निरपेक्ष, स्वरूपाचा होता, त्यात हिंदूत्व - हिंदू राष्ट्रवाद विचाराला अधिकृत मान्यता नव्हती, त्याची जागा सर्व भारतीयाने घेतली. स्वातंत्र्यपूर्व नि स्वातंत्र्योत्तर काँग्रेस पुरस्कृत हिंदी राष्ट्रवाद विचार नि नवोदीत जनसंघाचा भारतीय राष्ट्रवाद याची रुपे एकच होती. नवजात जनसंघाचे पहिले सरकार्यवाह श्री मौलीचंद्र शर्मा यांनी प्रकट मुलाखतीत रा. स्वं. संघ हमारी आत्मा है. सांगत असतानाच भारतीय जनसंघ म्हणजे कॉंग्रेसचे दुसरे रुप आहे Indian - भारतीय National - जन Congress- संघ अशा शब्दांत जनसंघाचे स्वरुप विषद केले. मा. गो. वैदय (हिंदुत्व- जुने संदर्भ नवे अनुबंध पृ ३-२७) ग्रंथात म्हणतात की जनसंघ जरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजकीय आघाडी असली तरी भारतीय राष्ट्र Indian Nation हि संकल्पना केवळ भौगोलिक (Teritorial) कसलाही गुणार्थ नसलेली आहे. संघ स्थापनेमागील विचारांचा मुलस्त्रोत सावरकरांचा हिंदुत्व हा ग्रंथच होता. डॉ. हेडगेवारांचा कॉंग्रेसवरील विश्वास उडत चाललेला होता त्यांच्या मानसिक गोंधळाला स्थिरता देणारा युगप्रवर्तक, अमृतकुभ व्रत वाटणारा ग्रंथ हाच (ना. ह. पालकर, डॉ. हेडगेवार चरित्र तृ. स. १२१).

अनिल व्दितीय सरसंघचालक, श्री मा. स. गोळवलकर गुरुजी यांच्या काळानंतर जनसंघाची निर्मिती झाली व नवजात जनसंघाचे रुपांतर एक तर हिंदु महासभेत होईल किंवा कॉग्रेसमध्ये होईल अन्य पर्याय नाही (श्री पु. गोखले अशी विरवाणी पृ ९२, ९३).

१९७५ ला देशावर आणिबाणीचे संकट कोसळले जनसंघासहीत कॉग्रसत्तर पक्षाचे नेते गजाआड कालागृहात गेले. १९ महिन्याच्या कालावधीनंतर नेतेमंडळी मुक्त झाली. सर्वच पक्षावर कोसळलेल्या समाजसंकटातून जनता पक्ष अस्तित्वात आला. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधिष्टीत झाला, पण जनता पक्षांतर्गत व्दिसदस्यत्व दुहेरी निष्ठेच्या प्रश्नावरुन वादळ उठले, वादंग निर्माण झाले. जसा जन्माला आलो, तसा मतभेदाच्या खडकावर फुटुन, आपटून, छिन्नविछिन्न झाला. जनसंघावर दुहेरी निष्ठेचा आरोप झाला. कारण त्या पक्षाचे नेते संघाशी संबंधित नव्हते तर बांधिलकी माननारे होते. जनता पक्षातून फुटुन जनसंघ भारतीय जनता पक्ष म्हणून स्थापीत झाली. तत्पुर्वी परराष्ट्रमंत्री (जनता पक्षाच्या सत्ताकाळात) अटलबिहारी वाजपेयी यांनी इंडियन एक्सप्रेस मध्ये लेख लिहून आपले विचार व्यक्त केले. संघ आपली दारे मुसलमानांसाठी का खुली करत नाही. देबसरच्या अलिकडच्या वक्तव्यावरुन अहिंदु पण संघात प्रवेश देण्यासाठी उत्तेजन देण्यात येत आहे. या प्रकियेची स्वाभाविक परिनीती संघाचा हिंदु राष्ट्रवाद म्हणजे हिंदु अहिंदुना या दोघांनाही समानपणे समावेश करणारे भारतीय राष्ट्रच होय. (दि. ०२/०८/१९८५ स. ह. देशपांडे - सावरकर ते भाजप प्र. ५६) श्री का. भा. लिमये यांच्या सारख्या अधिकारी नेत्याचे आक्षेप डावलून संघाने वाजपेयींच्या म्हणण्याला अनुकुल प्रतिसाद देत संघाची दारे अहिंदुंना मोकळी केल्याची घोषणा केली.

संघाच्या मुलभुत गाभ्याच्या तत्वाशी विसंगत व अगम्य अशी नवी भुमिका संघानी घेतली. मग संघाने सावरकरांच्य पुण्यभू चा आग्रह सोडून दिला. सर्व धर्मपंथीयांचा समावेश करणारे भारतीय राष्ट्र Indian Nation म्हणजेच हिंदु राष्ट्र ही नवस्विकृत भुमिका स्विकारली व हिंदुत्वाची कक्षा रुंदावून व्यापक हिंदुत्व असा भ्रामक शब्दप्रयोग प्रस्थापित करण्यात आला. मग अर्थातच धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर हे सुत्र नाकारले (त. ला. डॉ. हेडगेवार विशेषांक १९८९ पृ.८८). यातुनच मग धर्म बदलला म्हणजे राष्ट्रीयत्व बदलत नाही . बदलते ती केवळ उपासना, पुजा पध्दती असे विचार संघीय नेते बोलू लागले पण यातून ऐतिहासिक वास्तव दडपून, दाबून कसे लपवणार आहोत. पाकिस्तानची मागणी करणारे काही कोणी तुर्की नव्हते ते ना इराणी नव्हते किंवा अरबी मुसलमान होते. इराणी नेते सारे धर्मांतरीय होते. आजचे आतंकवादी, दहशतवादी, दंगलखोर, घुसखोर, पंचमस्तंभीम कोण आहेत. सारे धर्मांतरीय आहेत एक रक्त एक खानदानाचे आहे. जनसंघ - भाजपच्या असल्या धरसोड वृत्तीमुळे हिंदुस्थान कधिही हिंदु राष्ट्र बननार नाही. हिच हिंदुत्व - हिंदुराष्ट्र विचारांची सत्तेपोटी झालेली विटंबना, प्रतारणा शोकांतिका आहे.

हिंदुत्व -हिंदु राष्ट्र विचारप्रणालीवर स्वातंत्र्यपूर्व काळात जातीयवादाचा, धार्मीकवादाचा आरोप करण्यात येत होता. स्वातंत्र्योत्तर खंडित हिंदुस्थान आजही महासभेवर आरोप होत होता, तो आज संघ भाजपवर होत आहे. धरसोडीचे धोरण, तात्वीक तडजोड नव्हे तर तत्व व्युती स्विकारुन सत्ताधिष्ठीत होता येते परंतु अशा डावपेचांनी हिंदुत्व विजयी ठरणार नाही.

सावरकर ही हिंदुत्वाची शेवटची किंकाळी. हिंदु महासभा ती उराशी आजही बाळगून आहे. पक्षीय निवडणुकीच्या काळात ती निष्प्रभ, निस्तेज थकली असली तरी निर्जीव झालेली नाही, निसत्व झालेली नाही. शेवटी हिंदु महासभा म्हणजे एक तत्व विचार, एक सनातन सत्य आहे. एक चिरंतन चैतन्य आहे. क्रॉमवेलचे थडगे उकरुन त्याला फासावर देण्यात आले, फ्रान्स फ्रान्स करीत सेंटहेलेनामध्ये एकाकी शेवटचा श्वास सोडणा-या नेपोलियनला कालांतराने राष्ट्रीय सन्मान मिळाला. चीनवर जमेल त्या राष्ट्राने सुरा चालवून ज्यांच्या देहाचे लचके तोडले तो चीन आज जगाला आव्हान देत आहे. हिंदुत्व - हिंदु राष्ट्र हे हिंदुस्थानाचं शाश्वत सत्य आहे. काळ वेळ यावयाची आहे. हिंदुत्व जपुन ठेवणे अंतीमता हिंदु राष्ट्रहिताचे आहे. हिंदुत्व हे शेवटी एक व्रत आहे, एक सतीचे वाण आहे. ते अग्नीपरिक्षेत नक्की उतरणार.

इ. सन.१९२४ पूर्वीचे सावरकर क्रांतिकारी सावरकर होते. स्वातंत्र्यासाठी काय करायचे, कोणत्या मार्गाने जायचे ते मार्ग निवडीचे स्वातंत्र्य त्यांना होते. क्रांतीचा मार्ग स्विकारलेल्या व्यक्तिने स्विकारलेला मार्ग त्याचा स्वतचा असतो. १९२४ नंतर मात्र सावरकर पूर्णत बदललेले दिसतात. रत्नागीरीतील स्थानबध्दतेत सावरकर एक अग्रगण्य समाजसुधारकाच्या भूमिकेत साकार झालेले दिसतात. आपल्या राजकारणला सामाजिक सुधारणेचा पाया घालणारे सावरकर अविश्रांत श्रम करणारे सावरकर होते. १९२४ पर्यन्त भारतीय राजकारणाचे स्वरुप जनमताच्या एका पायावर विकसित होत चाललेली होती. सशस्त्र क्रांती घडवून आणू पाहणारे सावरकर अशी आपल्या मनाप्रमाणे इतिहास घडवून आणू पाहणा-या सावरकरांना १९११ ते १९२४ सालपर्यन्त तुरुंगात खितपत पडावे लागले होते.

राजकारणात सावरकरांनी टिळकांना आणि चिपळूनकरांना गुरु मानलेले होते. हुतात्मा दामोदर चाफेकर हे त्यांचे प्रेरणास्थान होते. सावरकरांनी रत्नागीरीत ज्या समाजसुधारणा केल्या त्या सर्वात, त्या करीत असताना सावरकरांनी वेदांच्या

संबंधि घेतलेली भूमिका अभूतपूर्व आहे. ही भूमिका घेताना सावरकर आपल्या प्रेरणास्थानाच्या भूमिकेपासून आणि गुरुच्या वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंकारापासून कसे दुर जात होते हे समजून घेणे, म्हणजे त्या व्यक्तिमत्वाचा विकास व्यापकतेकडे कसा होत होता हे समजून घेणे होय. (रावसाहेब कसबे - हिंदू - मुस्लीम प्र. क्ष अंजली सावरकराचा हिंदूत्ववाद पृ २१०).

महापुरुषांना समजावून घेण्यासाठी ऐतिहासिक समाजशक्ती समजून घ्यावचा लागतात. इतिहासातील सामाजिक प्रकीया शोधावी लागती- की ज्या प्रकियेत व्यक्ती एक सामाजिक प्राणी असतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांना १९२४ साली सुध्दा त्यांच्या मनातील आदर्श समाजसेवेचे चित्र रेखाटता आले नाही. कारण त्या कालखंडातील त्यांचे अस्तित्व ज्या इतिहासावर वाटस्थांनी बांधलेले होते, ती बंधने या मार्गातील सर्वात मोठी अडचन होती. सावरकर.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ - एक प्रखर हिंदूत्ववादी संघटना

विचारधारा संघटना, कार्यकर्ते यादृष्टीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आज देशाच्या मध्यवर्ती स्थानी आलेला आहे. संघ स्वतःच एक प्रचंड शक्तीकेंद्र झालेला आहे. संघाचे भवितव्य देशाच्या भवितव्याशी निगडीत झालेले आहे. एखादे बीज असते त्यातुन अंकुर प्रकट होतो, त्याचाच विशाल वृक्ष बनतो आणि त्या वृक्षाला फुले येतात, फळे लागतात. बाहयतः जसे बीज असते तसाचा अंकुर नसतो. जसा वृक्ष नसतो. तशी फुले असतात त्या आकाराची फळे नसतात. या सर्व प्रकारच्या परिवर्तनामध्ये बाहयरुप वेगळे असले - तरी बीज तेच असते सर्व सजीव सृष्टीत असे परिवर्तन होत असते. आर.एस.एस. ही एक सजीव अस्तीत्व (Living Organism) आहे. आणि त्यात बदल होत गेला आहे हे बदल त्याच्यातील जीवनरस आटला नसल्याचे द्योतक आहे. बदल होत असला तरी संघ तोच आहे. कारण त्याचा जीवनरस आणि जीवनतत्व तेच कायम राहिले आहे. मानव दिर्घायूष्य मानला तरी त्याचे आयुष्य शंभर वर्षाचे असते पण संघाचे तसे नाही माणसाने आयुष्य दशकाने मोजले जात असते तरी संस्थाचे आयुष्य शतकांनी मोजले जाते. राष्ट्रीय कॉंग्रेस १३५ वर्षाची झाली आहे. शंकराचार्याची पीठे दीडहजार वर्षापासुन चालू आहेत. वारकरी संप्रदायाचा प्रसार होवून शतके लोटली आहेत. तरी ती चालूच आहेत. असंख्य संस्थानी या जगात चिरंजीवीत्व प्राप्त केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघटना चिरंजिवित्वाची धनी बनून वाटचाल करीत आहे. त्यासाठी आर.एस.एस.चा प्रारंभ व विकासाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

आर.एस.एस.चे संस्थापक डॉ. केशवराव बळीराम हेडगेवार यांचा जन्म १ एप्रिल १८८९ वर्ष प्रतिपदेला नागपूर येथे गरीब ब्राम्हण कुटूंबात झाला. देशभक्तीचे बाळकडू लहाणपणीच मिळाल्यामुळे प्रज्वलीत देशभक्तीचा परिचय त्यांच्या शिक्षण काळातच व्यक्त झालेला दिसून येतो. मुठभर मुगल सरळ दिल्लीच्या तख्तावर बसतात, अल्लाऊद्दीन खिलजी हजार दिडहजार सैन्यासह येवून देवगीरी लुटतो आणि सुरक्षितपणे निघून जातो. सहा हजार मैल दूर असलेले मुठभर ब्रिटीश आमच्या विशाल देशाचे मालक कसे बनले त्यावेळी आपण काय करीत होतो. आपण आपल्या जहागीऱ्या आपल्या जाती श्रेष्टत्व सांभाळून एकमेकांवर तलवारी चालवत होतो. एखाद्या परकीयांनी समाज लुटला, बायकापोरांची अब्रु घेतली, मंदीरे उध्वस्त केली तरीही आपण एकत्र येवू शकत नाही. एखादया राजाऐवजी दुसऱ्या राजाची चाकरी कररण्यातच त्याच्या मदतीने स्वकीयाचा बदला घ्यावयाचा त्याच्या बरोबर इतर देशात लढाया करावयाला जावयाचे अगदी प्राणपणाने जावून लढवयाचे मुर्दूमकी गाजवायची शांततेच्या काळात देशमुख्या, पंचकुळी, ९६ कुळी, कोकणस्थ्, देशस्थ, अस्पर्श - स्पर्श हे सर्व सांभाळावयाचे. शेकडो जातीने विभागलेला हा समाज म्हणजे आपल्या जातीतल्या भावकीचा द्वेष करणारा होता. "परकीयासाठी हा समाज म्हणजे पिकाऊ राण होते." परकियांनी काहीही पेरावे याची काळजी आम्ही घेवू. स्वकियाने काहीही पेरावे ते उखडून टाकण्याची जबाबदारी आम्ही घेवू ती देखील परकीय राजकर्त्याची मदत घेवून हे सर्व पाहून बाल्यावस्थेत संघ संस्थापक हेडगेवार यांना गुलामगिरीची चीड आली. वयाच्या ९ व्या वर्षी मराठीच्या तिसऱ्या वर्गात असताना शत्रूवर राज्य करणाऱ्या इंग्लंडच्या महाराणीच्या राज्यरोहणाच्या हिरक महोत्सवा निमीत्त शाळेत वाटलेली मिठाई न खाता ती उकीरडयावर फेकुन दिली होती. मॅट्रिकच्या वर्गात असताना, शाळा निरीक्षकाचे स्वागत वंदे मातरम या मंत्रघोषाने करुन त्यांनी स्वतःवर निष्ठासनाची शिक्षा ओढवून घेतली. हेडगेवार यांनी याबद्दल माफी मागितली नाही. नागपुर सोडणे पत्करले बाहेरुन मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण केली. आपल्या विद्यार्थीदशेच्या काळातच त्यांनी स्वदेशी आंदोलनात संक्रीय सहभाग घेतला. स्वदेशी चळवळीसाठी लोकमान्य टिळकांनी पैसा फंड स्थापन केला. त्याच्या निधीसाठी हेडगेवार यांनी मोठे योगदान दिले. (संघ दर्शन पान १२) स्वदेशी वस्तुच्या विक्रीचा प्रचार परकीय वस्तुवर बहिष्कार इ. कार्यात त्यांनी निरंतर सहभाग घेतला.

डॉक्टराचे शिक्षण घेण्यासाठी ते मुंबईला नाही तर १९१० मध्ये नॅशनल मेडीकल कॉलेज कलकत्ता इथे प्रवेश घेतला. ते कलकत्त्याला गेले. क्रांतीकारकाचे आधुनिक प्रेरणास्थान सुप्रसिध्द क्रांतीकारक रास बिहारी दास याच्या संपर्कात ते आले. अनुशिलन समीतीत त्यांना प्रवेश मिळाला. डॉक्टरांचे शिक्षण घेत असतानाच क्रांतीकारक आंदोलनात भाग घेतला.

तत्कालीन प्रसिध्द क्रांतीकारी नेता शामसुंदर चक्रवर्ती, बाबु मोतीलाल घोष, अमृतबाजार पत्रिकेचे संपादकगण इ. च्या क्रांती कार्यात सक्रीय भाग घेतला. १९१५ मध्ये केशवराव यांनी डॉक्टर ही पदवी प्राप्त केली. डॉक्टरांनी पदवी प्राप्त करुनही त्यानी डॉक्टरकीचा व्यवसाय कधी केला नाही १९१६ मध्ये कलकत्याहुन नागपुरला ते परत आले. देशाच्या स्वातंत्र्यांसाठी त्यानी आजन्म ब्रम्हचार्य राहण्याची शपथ घेतली. आणि आयुष्यभर राष्ट्ररोगावरील आजन्म उपचार व निदान करण्यातच त्यांनी कुशल डॉक्टर म्हणून भूमिका बजावली.

पुढे त्यांच्या लक्षात आले की चार दोन ब्रिटीश अधिकाऱ्यांना ठार मारुन देश स्वतंत्र व्हावयाचा नाही. लोकांच्या मनात स्वातंत्र्याची आंकाक्षा निर्माण झाली पाहीजे. इंग्रजाचे राज्य म्हणजे दैवी वरदान आहे. अशी सर्वसाधारण मानसिकता असलेल्या देशात क्रांतीकारकाचे असामान्य बलीदान व्यर्थ ठरते हे ध्यानात येताच डॉ. हेडगेवारांनी तो मार्ग सोडला व कॉग्रेसच्या जनजागृतीच्या आंदोलनात सर्वशक्तीनिशी स्वतःला झोकून दिले. जहाल भाषणे केली, वृत्तपत्रातुन त्यांनी अग्नीचा वारसा घेतलेले लेख लिहिले त्यापायी सक्षम कारावास भोगला. टिळक पर्व संपून गांधीयुग सुरु झाले. तेव्हा गांधीजीचे अनुयायीत्व त्यांनी स्विकारले त्यांनी सुरु केलेल्या असहकार चळवहीतही भाग घेतला. हे सारे करीत असताना तळमळ होती देश कसा स्वतंत्र होईल. केवळ जनजागृतीने देश स्वतंत्र होणार नाही. निशस्त्र जनतेचा केवढाही विशाल सागर उफाळुन आला तरी बंदुकीतील गोळया त्या सर्वाना ओहोटी आणू शकतात. हे १९१९ साठी जालियनवाला बागेत झालेल्या हत्याकांडाने स्पष्ट केले. कोणताही विचारवंत, कार्यकर्ता हा तत्कालीन परिस्थितीची अपत्य असतो. डॉ. हेडगेवार याला अपवाद नाहीत. त्याकाळात प्रामुख्याने राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि समाजाचे सर्वांगीण परिवर्तन ही भारतीय समाजापुढची आव्हाने होती. राष्ट्रीय सभेच्या (कॉंग्रेसच्या) स्वरुपात राष्ट्रीय प्रवाह विकसीत झालेला होता. राष्ट्रीय सभेच्या वार्षिक अधिवेशनातुन सामाजिक सुधारणेपासून ते देशाच्या पूर्ण स्वातंत्र्यपर्यंतच्या अनेक विषयावर ठराव पास होत होते. अर्ज विनंत्या पासून सत्याग्रहापर्यंत अनेक मार्गाचा अवलंब केला जात होता. कॉंग्रेसचे धोरण सर्वसमावेशक असेच होते. भारतातील अल्पसंख्याकाच्या मनात कॉंग्रेसचे कार्य आणि कार्यपध्दती विषयी अविश्वास निर्माण होणार नाही याची काळजी कॉंग्रेसचे नेते घेत होते. दादाभाई नौरोजी, तैयबजी इ. अल्पसंख्याक नेते कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर निवडले गेले. असा प्रयत्न करुन देखील कॉंग्रेसला मुस्लीमांचा विश्वास संपादन करता आला नाही. त्याकाळी (१९२०) कॉंग्रेसने मुस्लीम अनुनयवादी राजकारण केले. १९२० साली खिलाफतीचे आंदोलन देशात सुरु झाले. मुसलमानाचे नेतृत्व मुल्ला मौलवीच्या हाती गेले. मुसलमानाला बरोबर घेतल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही अशी महात्मा गांधीजीची धारणा होती. म्हणूनच त्यानी मुसलमानाना बरोबर घेण्यासाठी मुस्लीमाच्या मागण्या मान्य केल्या.

याच कालखंडात देशात मुस्लीमाचे दंगे झाले केरळात मोपला मुसलमानाचे बंड झाले त्यात हजारो हिंदु मारले गेले. हिंदु समाजात मुस्लीम आक्रमकतेमुळे कमालीचा असुरक्षितता निर्माण झाली. आपण संघटीत झाल्याशिवाय मुस्लीम आक्रमकतेसमोर टिकू शकत नाही. असा विचार अनेकांनी मांडला.

कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात मुस्लीम प्रतिनिधींची संख्या कमी होत गेल्याचे आकडेवारीवरुन स्पष्ट होते. मुस्लीम समाजाची राष्ट्रीय प्रवाहापासूनही अलगता वाढतच गेली. एकेकाळी राजकर्ते असलेले मुस्लीम सामान्य नागरिक बनल्याचे त्यांना दुःख होते. त्यांच्यातील वैफल्यांच्या भावनेला ब्रिटीशानी खतपाणी घातले. मुस्लीमांच्या अलगतेतुन ब्रिटीश शासनाला बळकटी येईल असे त्यांना वाटत होते. मुस्लीमांचा अलगतावाद, ब्रिटीश राजकत्याकडून अवलंबलेली फोडा आणि झोडा ही निती व कॉंग्रेसकडून केली जाणारी मुस्लीमांची मनधरणी या तीन गोष्टीच्या भोवऱ्यात राष्ट्रीय प्रवाह सापडला. स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही निर्माण होण्याची चिन्हे स्पष्ट झाली होती. संसदीय लोकशाहीत बहूमताच्या हाती सत्तासुत्रे असतात. बहूसंख्य समाज हिंदु असल्यामुळे हिंदूच्या हाती सत्ता जाणार असे मुस्लीम समाजाला वाटू लागले. बहुसंख्य व अल्पसंख्याक असा समाज ब्रिटीश राजवटीत प्रजाजन या स्वरुपात होता व स्वतंत्र भारताचा नागरीक या स्वरुपात होता. राष्ट्रीय प्रवाह म्हटल्यांनतर त्यात बहुसंख्य व अल्पसंख्याक असा भेद करणे असमर्थनीय आहे. अल्पसंख्याकानी राष्ट्रीय प्रवाहाशी साहजिकपणे एकरुप व्हावयास पाहीजे त्यासाठी मनधरणी करण्याचे कारण नाही.

अशा या परिस्थितीत समाजाला जागृत करण्यासाठी अनेक अंदोलने व संघटना निर्माण झाल्या त्या काळातच पुनरुज्जीवनावर आधारित भारताच्या नवनिर्माणाची लाट विकसीत झाली. प्राचीन भारताच्या वैभवाचा अभिमान बाळगुन भारताला पुन्हा एकदा वैभवप्राप्त करून देण्याचे स्वप्न साकारण्याचा विचार आग्रहपुर्वक मांडला गेला. या दृष्टीने रामकृष्ण मिशन, आर्य समाज, थिऑसफीकल सोसायटी, ब्रम्हो समाज या चळवळीना महत्वपूर्ण स्थान आहे. त्याचबरोबर समाज सुधारण्यासाठी प्रार्थना समाज, प्रौढ विवाह, विधवा विवाह, सहभोजन, सहशिक्षण, अस्पृश्यता निवारण, शुध्दी अंदोलन, इ. जनप्रबोधनाचे कार्य देणे. डॉ. हेडगेवार या सर्व घडामोडीचे साक्षेपी साक्षीदार होते.

राष्ट्रीय सभेची अगतिकता, मुस्लीमाचा अलगतावाद, ब्रिटीशाचे भेदनितीचे राजकारण, सामाजिक परिवर्तनाच्या समस्या इ. बहूविध प्रश्नांच्या संदर्भात डॉ. हेडगेवारांचा मुलगामी विचार केला हिंदु व्यक्तीची व समाजाची दुर्बलता या समस्याच्या मुळासी आहे याची खात्री त्याना झाली. हिंदु व्यक्ती सामाजिक समस्याच्या संदर्भात मला त्याचे काय अशी व्यक्तीची प्रवृत्ती आहे. त्याचबरोबर हिंदु समाज असंघटीत आणि विस्कळीत आहे. या दौर्बल्यावर एकमेव उपाय महणजे व्यक्तीची जडण-घडण, आणि हिदुचे संघटन होय. या दोन संकल्पनेच्या सिध्दीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निर्माण झाला. हिंदू संघटन व्हावे असे अनेकांना वाटत होते. स्वा. सावरकरांच्या जीवनाकार्याचा आत्माच हिंदु संघटन होता परंतु त्यांचा हिंदू संघटन विषयक दृष्टीकोन हा डॉ. हेडगेवार यांच्या दृष्टीकोनापेक्षा वेगळा होता. राजकारणाचे हिंदूकरण आणि हिंदूचे लष्करीकरण या सुत्राचा त्यानी पुरस्कार केला. सावरकर हे तत्वचिंतक व क्रांतीकारक होते. डॉ. हेडगेवार हयाच्या स्वंयसेवक संघाची कल्पना वेगळी होती. हिंदू संघटन झाले पाहिजे. हे या दोन महापुरुषांचे ध्येय होते. परंतु दोघांचा दृष्टीकोन भिन्न होता. दोघाचीही राष्ट्रभक्ती पारदर्शक होती. स्वा. सावरकरांनी हिदु राष्ट्रवादाचा सिध्दांत मांडला व सातत्याने आग्रही प्रचार केला. त्यांच्या हिंदुत्वात समावेशकता होती सनातन धर्मीय बौध्द, जैन, शीख इ. घटक त्यात समाविष्ट होतात कारण ते पितृभू व पुण्यभू या गुणनिकषावर उतरतात. त्यात मुस्लीम ख्रिश्चन इ चा समावेश होत नाही या अर्थाने त्या हिंदुत्वाच्या मर्यादा स्पष्ट होतात.

डॉ. हेडगेवारांनी हिंदु स्वयंसेवक संघ असे न म्हणता राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असे नामाभिधान केले. यातुन असे स्पष्ट होते की, हिंदु समाजाच्या मनामध्ये स्वाभाविकपणे मुस्लीमाविषयी जो अविश्वास आहे त्याचा आधार बनवून संघटना उभी केली नाही. मुसलमान संघटीत आहेत म्हणून हिंदूनी संघटीत झाले पाहिजे या विचारावर त्यांनी संघटना उभी केली नाही. तर डॉक्टरांच्या कल्पनेतील हिंदु संघटनेचा खोलवर विचार केला तर आज ना उद्या हिंदु संघटीत करता या संघटनेच्या व्यापक परिधात या देशतील पुर्वाश्रमीचे सर्व हिंदू यात सामील होतील. अशा व्यापक दृष्टीकोनातून त्यांनी संघटना निर्माण केली. ही संघटना ही स्वा. सावरकरांच्या परिभाषेतील हिंदुची असली तरी तिचे दरवाजे अहिंदुसाठी खुले आहेत. राष्ट्रीय शब्दातुन संघाच्या व्याप्तीची अभिव्यक्ती होते. भारत मातेची संतान असलेली व तिच्यावर निर्भेळ निष्ठा असलेली व्यक्ती हिंदु संघटनेच्या चौकोटीत बसते. आपण हिंदुचे संघटन करतो म्हणजे हिंदु धर्मीयांचे संघटन करतो असा त्याचा अर्थ नाही.

उपासना पध्दती या अर्थाने धर्म हा संघाचा आधार नाही. डॉक्टरांनी स्वयंसेवकांना कोणत्या देवाची उपासना करण्यास सांगीतले नाही. कोणत्याही धर्मग्रंथाचा त्यांनी संघाचा आधार बनविलेला नाही. हिंदू असण्यासाठी त्यांनी कोणती धार्मीक कर्मकांडे अनिवार्य मानली नाहीत. थोडक्यात उपासनापध्दती धर्मग्रंथ, देवदेवता हे त्यांच्या संघटनेचे आधार नाहीत. म्हणून डॉक्टरांचे हिंदु संघटन हे धार्मीक संघटन नाही. धार्मिक संप्रदाय सुध्दा नाही.

मुसलमान इस्लामच्या आधारे संघटीत असतात पवित्र कुराण हा त्यांच्या संघटित असण्याचा एक मुख्य आधार आहे. त्यामुळे मुस्लीम संघटन हे धार्मिक संघटन आहे. ख्रिश्चन समाजही येशू ख्रिस्त, बायबल आणि चर्चच्या आधारे संघटित असतो. ख्रिश्चन समाजाचे संघटनही धार्मिक संघटन ठरते. हिंदू समाजातील शीख गुरु ग्रंथसाहेब आणि गुरुद्वाराच्या माध्यमाद्वारे संघटित असतात. त्याचेही संघटन धार्मिक असते. बौध्द हे भगवान गौतम बुध्द व विहाराच्या आधाराने संघटित असतात. त्याचेंही संघटनेत धार्मिक असतात. हिंदुच्या संघटनेचा अशाप्रकारचा राजमार्ग डॉक्टरांनी स्विकारलेला नाही. कारण उपासनापध्दती, धर्मग्रंथ आणि महापुरुष यांच्या अधारे समग्र हिंदु समाजाचे संघटन करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. देशातील सर्व हिंदूना मान्य होईल असा एखादा धर्मग्रंथ आजतरी उपलब्ध नाही. वेद सर्व धर्माचे मुळ समजले जातात पण वेद नाकारणारे हिंदु असतात. राम-कृष्ण, शिव ही देशात सर्वाधिक पूजली जाणारी दैवते आहेत. आणि या तिघांनाही नाकारणारे हिंदु मोठया संख्येने आहेत. म्हणूनच डॉक्टरांना तर समग्र हिंदु समाजाचे संघटन करावयाचे होते म्हणून हे संघटन धार्मिक संघटन करावयाचे नव्हते.

संघटनेचा आणखीन एक आधार असतो. तो वंश असतो. आपल्या देशात आर्यवंश, द्रविड वंश, परिशियन वंश, मंगोलियन वंश असे विविध शब्दप्रयोग वापरले जातात. परंतु हे लक्षात येते की, डॉक्टरांनी हिंदु हा शब्द वंश वाचक अर्थाने वापरला नाही वांशिक अभिमान जागृत करताना इतर मानव वंशापासून आपले वेगळेपण जोरदारपणे मांडले जाते. इरावती कर्वे या मानववंश शास्त्रज्ञ म्हणते की मी कन्याकुमारी पासून काश्मिरपर्यंत भारतीयाचा अभ्यास केला पण मला एकही आर्यवंशीय सापडला नाही. भारतीय मुळ वंशात इतर अनेक (शक, मोगल, पोर्तुगीज, ब्रिटीश) वंशाची अशी काही सरमिसळ झालेली आहे की त्यातुन वेगळेपण दाखवणे हे अत्यंत अवघड काम आहे. गंगेचा एकच प्रवाह वाहत असतो. या गंगेला अनेक नद्या येवून मिळतात. आणि त्या गंगामय होतात तसे भारतात झाले आहे. वंश ही संज्ञा वापरून म्हणावयाचे तर भारतात राहणारे सगळेच हिंदू वंशीय आहेत.

म्हणूनच डॉक्टरांनी हिंदू संघटन सुरु केले त्याचा आधार उपासनापध्दती, धर्मग्रंथ धार्मिक महापुरुष किंवा वंश न बनविता राष्ट्रीयता हा आधार बनविला, डॉक्टरांनी हिंदू आणि राष्ट्रीय हे शब्द समान अर्थाने वापरले आहेत. म्हणून संघाचे नाव आरएसएस असे ठेवले आहे. राष्ट्रधर्म हाच खरा धर्म ते मानतात.

हिंदुचे राजकीय संघटन बांधण्यासाठी हिंदु महासभा अस्तीत्वात आली पुढे हिंदुमध्ये धर्मजागरण करण्यासाठी विश्व हिंदू परिषद अस्तीत्वात आली. या संघटनेच्या नावातच हिंदु असल्यामुळे त्याचे काम फक्त हिंदू समाजापुरतेच मर्यादीत आहेत.

संघाचे जेष्ठ प्रचारक स्व. नानासाहेब ढोबळे म्हणतात की, हिंदू समाज हा राष्ट्रीय समाज आहे हा देश हिंदुचा आहे. हिंदुचे काम हे राष्ट्रीय काम बाहे म्हणून संघाचे नाव आर.एस.एस. आहे.

राष्ट्रीय व अराष्ट्रीय ही दाखवण्याची वृत्ती भक्तीमय आहे की भोगवादी आहे हे पाहूनच ठरवले पाहिजे. कवी इक्बाल हे हिंदुस्थानचे वर्णन करताना हम बुलबुले है इसकी यह गुलिस्ताँ हमारा म्हणजे तो आमचा बगीचा आहे. आणि आम्ही त्यातले लहान सहान बुलबुल पक्षी आहोत. ही भोगवादी वृत्ती डॉक्टरांना कधीच मान्य नव्हती. या देशात भारतीयांना मानणाऱ्या देशभक्ताकाच्या म्हणजे हिंदुच्या मुखातून अशी भाषा कधीच बाहेर पडणार नाही.

### राष्ट्रसंवर्धनाचा दृष्टीकोन -

डॉक्टर राष्ट्रीय व अराष्ट्रीयतेची व्याख्या उपासना पध्दतीवरुन करीत नाहीत एखादा हिंदू देवदेवतांची पूजा करतो म्हणून तो राष्ट्रीय आहे. आणि दुसरा कोणी अल्ला व येशूची पुजा करतो म्हणून तो अराष्ट्रीय अशी मांडणी डॉक्टरांनी केली नाही. राष्ट्रीयतेची एकच कसोटी ते सांगतात की भारतमातेकडे पाहण्याची दृष्टी भक्तीमय आहे की भोगवादी आहे यावरुन तो राष्ट्रवादी व अराष्ट्रीयवादी ठरु शकतो. जे भारत मातेला आपली मातृभू मानतात व तिची भक्ती करतात तो राष्ट्रीय होता व हिंदू होत. (भारतीय भूमीसंबंधी भारतयात्रा ही भक्तीवादी दृष्टीकोन) राष्ट्रीयतेची डॉक्टरांनी निर्धारित केलेली कसोटी स्विकारली की जन्माने हिंदू म्हणून तो राष्ट्रीय ठरत नाही. एखादा अहिंदू आहे म्हणून तो अराष्ट्रीय ठरत नाही. जन्माने हिंदू परंतु कृत्तीने तो जर भारत विध्वसंक अथवा भोगवादी असेल तर तो अराष्ट्रीयच त्याचप्रमाणे तो जन्माने अहिंदू आहे पण भारत भक्त आहे त्याला राष्ट्रीय म्हणजे हिंदूच म्हणले पाहिजे. डॉक्टराचे संघटन अशा धर्माचे राष्टीय संघटना आहे. म्हणुन मुसलमानाना सुध्दा आर.एस.एस. प्रवेश निषिध्द नाही. तो मुसलमान आहे म्हणून त्याला घालवून हाकलून लावण्याचे कारण नाही तो जर शाखेत कार्यक्रम करणार असेल आपण म्हणतो तो गीत म्हणणार असेल तर त्याला शाखेत प्रवेश द्यावा. थोडक्यात संघात या प्रवेशाची एकच अट ती म्हणजे राष्ट्रधर्माचे पालन केले पाहिजे.

डॉक्टराचा काळ मजेशीर होता एखाद्या चळवळीत मुसलमान नसेल तर ती चळवळ राष्ट्रीय नाही अशी बऱ्याच जनाचा समज होता त्यामुळे काहीही करुन मुसलमानाना आपल्या चळवळीत आणण्याचा प्रयत्न होई. कॉंग्रेसचे नावही राष्ट्रीय कॉंग्रेस असे होते आणि राष्ट्रीयतेची कॉंग्रेसची व्याख्या वेगळी होती हिंदु, मुस्लीम, शीख, पारशी, ख्रिश्चन, बौद जैन इ. भिन्न भिन्न धर्मियांचा हा देश आहे. हे त्यांच राष्ट्र आहे. व एक राष्ट्रीयत्वाची भावना आपल्या सर्वांना मिळुन करावयाची आहे. एक नवीन राष्ट्र आपल्याला घडवायचे आहे. ही कॉंग्रेसची विचारसरणी आहे. म्हणून आपली चळवळ राष्ट्रीय आहे हे दिसण्यासाठी कॉंग्रेसने सर्व धर्मीयांना जवळ केले. मुसलमानाना जवळ करण्याचा विशेषत्वाने प्रयत्न केला. कॉंग्रेसच्या तथाकथीत राष्ट्रीय चळवळीत सामील होण्याची किंमत मुसलमानानी वसुल केली. त्यांना वंदे मातरम हे गीत खटकले म्हणून ते कापले गेले. गोहत्या हा त्यांना आपला धार्मिक अधिकार वाटू लागला. कॉंग्रेसने त्याला मान्यता दिली. त्यांना संसदेत विभक्त मतदारसंघ दिला.

एखाद्या चळवळीत मुसलमान नसतील तर ती चळवळ राष्ट्रीय नाही हा अनर्थाला जन्म देणारा सिध्दांत आहे असे डॉक्टराचे म्हणणे आहे. त्याच्या मते मुसलमानानी नैसर्गिकरित्या स्वाभाविकपणे राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले पाहिजे. देशभक्ती हा सौदेबाजीचा विषय नाही. अशी त्यांची धारण होती. संघाचे काम धार्मिक नसल्यामुळे यात सहभागी व्हायला कुणालाच अडचण नाही. या देशातील सर्व मुसलमान पुर्वाश्रमीचे हिंदू आहेत त्यांना बळजबरीने व प्रलोभनाने बाटवून मुसलमान करण्यात आले आहे. आजचा मुसलमान समाज विदेशी आक्रमकाचा शिकार झालेला हिंदु समाज आहे. म्हणजेच हे आपलेच बांधव आहेत एका सांस्कृतिक व धार्मिक गुलामीत ते जगत आहेत. आपल्या धर्मग्रंथावर असिम श्रध्दा ठेवूनही मुस्लीम व्यक्ती राष्ट्रीय बनू शकते. असे डॉक्टरांची धारणा होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : लक्ष्य व कार्य.

हिंदु संघटनेतील प्रमुख अडथळा आहे. जातीव्यवस्थेचा. जाती व्यवस्था मोडून काढण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी अपरिमित परिश्रम घेतले. म. ज्योतिबा फुले म्हणतात, आपल्या देशातील सात, आठ करोड लोक विद्येच्या अभावी हजारो वर्षापासून आपली माणूसकी गमावून बसले आहेत व ते धार्मिक गुलामगिरीच्या घोर नरकात पडले आहेत.

आणि त्यामुळे हिंदू राष्ट्र लुळे बनून हिंदू धर्माचा ऱ्हास होत आहे. या वर्गात विद्येचा प्रचार झाल्याशिवाय त्याची अस्पृश्यता दुर होणार नाही. हिंदूस्थानात आणि हिंदू धर्मात अनेक पंथ, जाती व उच्च निचत्वाचे थोतांड माजवून स्पृर्श अस्पृश्यतेचे बंड माजवले नसते तर हिंदू लोकात एकी व प्रेम नांदले असते तर हिंदूस्थानाकडे वाकडया नजरेने पाहण्याचीही कोणाची हिम्मत झाली नसती.

हिंदु संघटनेच्या संदर्भात एका ऐतिहासिक योगायोगाची नोंद श्री धनंजय किर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या चरित्र ग्रंथात केली आहे. १९२४ हे भारताच्या इतिहासातील एक महत्वाचे वर्ष आहे. यावर्षी तीन प्रचंड शक्ती भारताच्या सामाजिक क्षेत्रात अवतरल्या. अंदमानच्या कारावासात एक तपाची घोर यातना भोगलेल्या स्वा. सावरकर येरवडयाच्या तुरुंगातुन सहा जानेवारीला सुटले. रत्नागिरीत त्यांना राजकीय चळवळीत भाग घ्यावयाचा नाही या अटीवर स्थानबध्द करण्यात आले. त्यांनी आपल्या सर्व शक्तीनिशी हिंदु समाजाच्या एकीसाठी अस्पृश्यतेचा समुळ नायनाट करणे व परधर्मात गेलेल्या हिंदुना परत हिंदु धर्मात घेण्यासाठी चळवळ उभी केली.

म. गांधीजीची खिलाफत चळवळ अयशस्वी झाली. येरवडा तुरुंगात गांधीजी कारावास भोगीत होते त्यांची प्रकृती बिघडली म्हणून ११ फेब्रुवारीला त्याची सुटका झाली. सुटकेनंतर त्यांनीही अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीस प्रारंभ केला व हरिजन सेवक संघाची स्थापना केली.

अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक नि राजकीय अडचणी सरकार पुढे मांडण्यासाठी व अस्पृश्यतेचे प्रश्न सोडविण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा या संस्थेची निर्मिती केली.

वरील तीन महापुरषाबरोबरच एक चौथे महापुरुष डॉ. हेडगेवार आहेत. हिंदु संघटनेच्या संदर्भात मोलाचे कार्य केले आहे. त्यांनी आम्ही सर्व हिंदू एक आहोत ना मग तसा सामाजिक व्यवहार केला पाहिजे. या व्यवहाराची तात्वीक भूमिका कोणती तर साऱ्या हिंदू समाजाविषयीचा एकात्मिक विचार ही आपली भारत माता आहे व आपण सर्वजण भारत मातेचे पुत्र आहोत म्हणून स्वाभाविकपणे आपण परस्पराचे बंधू आहोत, ही बंधूत्वाची भावना हा डॉ. हेडगेवारानी आर.एस.एस. संघटनेचा आधारभूत पाया बनविला (मला उमगलेले हेडगेवार, लेखक रमेश पंतगे पेज ५६)

अस्पृश्यता निवारण्याच्या संदर्भात म्हणजे हिंदू ऐक्याच्या संदर्भात डॉ. आंबेडकरानी अनेक क्रांतीकारक कार्यक्रम हाती घेतले. महाड चळवळ असो काळाराम मंदीर प्रवेश, मनूस्मृती दहन इ. शेवटी हिंदू धर्माचा त्याग करुन बौध्द धर्माचा स्विकार केला. तसेच म. गांधीच्या हरिजन सेवक संघाने हिंदुऐक्यासंबंधी विशेष काही केल्याचे दिसत नाही. स्वा. सावरकरांनी रत्नागिरी पर्वास मंदीर प्रवेश, सहभोजन, अस्पृश्यता स्पृश्याच्या घरी जाणे इ. धडाडीचे कार्यक्रम १९२७ पासुनच केले. रत्नागिरीत स्पृश हिंदुत त्यामुळे खळबळ माजली व अनेक स्पृश हिंदूना रुढी मोडल्याबद्दल जाती बहिष्कृत व्हावे लागले.

हिंदु ऐक्यासाठी अशा प्रकारचा क्रांतीकारी कार्यक्रम डॉ. हेडगेवारांनी हाती घेतला नाही कारण अस्पृशता निवारण हे एकमेव ध्येय ठेवून त्यांनी हिंदू संघटनेचे कार्य केले नाही. त्यांना अशाप्रकारचे हिंदू संघटन उभे करावयाचे होते की, ज्याचा एक स्वाभाविक परिणाम अस्पृश्यता निवारण आपोआप होईल. त्यासाठी विशेष काही केल्यास हिंदु संघटन या मुळ संकल्पनेला बाधा येईल. डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक लढे क्रांतीकारक होते. यात शंका नाही परंतू अशा लढयामुळे सामाजिक ऐक्य व हिंदू संघटन बलवान झाले असा हिंदू समाजाचा सामाजिक इतिहास सांगत नाही. डॉ. हेडगेवारांना ब्राम्हण, क्षत्रिय, शुद्र, वैश्य आणि सर्व अस्पृश जातीना हिंदू या एकाच भावनेने संघटीत करावयाचे होते. ज्याला केवळ समाज संघटन करावयाचे आहे तो सामाजिक संघर्षाच्या मार्गाने जावू शकत नाही. संघर्षापासुन कधीही मनोमिलन घडत नाही. यासाठी डॉक्टरांनी सामाजिक संघर्षाचा एकही कार्यक्रम केला नाही म्हणजे संघानेही सामाजिक संघर्षाचा मार्ग अनुसरलेला नाही.

समग्र हिंदू समाजाच्या संघटनेची डॉक्टरांना एक विशिष्ट दृष्टी होती. हिंदू समाजातील सामाजिक दोषानिशी त्याचे स्वतंत्र चिंतन होते. ते एखाद्या जातीवर्गाचा विचार करीत नसत. एका प्रदेशातील व हिंदूचाही विचार करीत नसत तर त्यांच्या डोळयापुढे असेतू हिमाचल पसरलेला समग्र हिंदू समाज होता. या समग्र हिंदू समाजाला त्यांना संघटीत करावयाचे होते. ते म्हणतात हिंदू समाजाच्या सामाजिक समस्या देशव्यापी आहेत. अस्पृश्यतेची रुढी ही देशव्यापी रुढी आहे. देशव्यापी समस्या सोडविण्यासाठी सर्वप्रथम देशव्यापी संघटना उभे केली पाहिजे. देशव्यापी संघटन उभे करण्यासाठी हिंदू संघटन हेच जीवन ध्येय मानणारे कार्यकर्ते घडवीले पाहीजेत. असे कार्यकर्ते देशाच्या कानाकोपऱ्यात गेले पाहिजेत. हिंदू बंधूत्वाचा भाव जागृत करुन या कार्यकर्त्यांनी देशव्यापी हिंदू संघटन उभे केले पाहिजे. अशी एक निश्चीत योजना आखून डॉ. हेडगेवार कामाला लागले.

अत्यंत कर्तृत्वान व बुध्दीमान तरुणांना त्यांनी हिंदू संघटनेच्या कामासाठी नागपूर, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातून देशभर पाठविले. सर्वश्री माधवराव मुळे पंजाबात गेले. भाऊराव देवरस उत्तर प्रदेशात गेले शिवरामपंत जोगळेकर तामीळनाडूत गेले. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी त्यांनी परप्रांतात जाण्याचा सल्ला दिला. देशव्यापी संघटन उभे राहिल्याशिवाय देशव्यापी समस्या सुटणार नाहीत. अशी त्यांची त्यामागची भूमिका होती.

हिंदू समाजातील असंख्य दोषाचे खापर अनेकांनी, हिंदु धर्मावर फोडले आहे. कारण अनेक रुढी पंरपरा धर्माचा भाग म्हणून पाळल्या जातात. दुर्दैवाने अस्पृश्यता धर्माचा भाग बनवला गेला. त्यामुळे धर्मसुधारणा झाल्याशिवाय सामाजिक सुधारणा, सामाजिक दोष निवारण व हिंदूऐक्य शक्य नाही ही गोष्ट अनेक समाज चिंतकांनी आग्रहानी मांडली. त्यात राजाराम मोहन रॉय, महर्षि दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, म. गांधी, स्वा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. स्वामी दयानंद सरस्वती यांनी वेदांत हाच आमचा धर्म आहे असे सांगून अनेक अनिष्ट रुढीवर तार्किक हल्ले केले. स्वामी विवेकानंदानी अद्वैत तत्वज्ञानाचा प्रचार केला. स्वा. सावरकरांनी उपयुक्तवाद आणि बुध्दी प्रमाण्याच्या कसोटीवर धर्मात पासुन घेण्याचा आग्रह केला. डॉ. बाबासाहेबांनी हिंदु धर्म बुध्दी प्रमाण्यावादी असूच शकत नाही असे वाटून शेवटी त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केला.

डॉ. हेडगेवार याचा हिंदू ऐक्याचा व समाजसुधारणेचा मार्ग वेगळा होता. त्यांच्या मते ज्याला धर्मसुधारणा घडवून आणावयाची आहे त्याचे स्वधर्मावर विलक्षण प्रेम हवे. स्वधर्मावर प्रेम असल्याशिवाय धर्मसुधारणा करता येत नाहीत. धर्म विध्वंसक धर्मसुधारणा करु शकत नाहीत. हिंदू समाजातील अस्पृश्यता, रुढीप्रियता शब्द प्रामाण्यवाद हे दोष हिंदू धर्माचा त्याग करुन अथवा त्यात नवीन पंथ निर्माण करुन किंवा धर्मशास्त्र नाकारुन करता येणार नाहीत.

डॉ. हेडगेवार यांची हिंदू संघटनेची जी कृती आहे. त्या कृतीच्याच आधारे हिंदू संघटन करता येईल. हिंदू धर्म व हिंदू संस्कृती याच्या विषयी डॉक्टारांच्या मनात अपार प्रेम आणि भक्ती होती. ते म्हणतात, आपल्या धर्माचे, समाजाचे व संस्कृतीचे रक्षण करणे हे संघाचे ध्येय आहे. काही लोकांना स्वधर्माचे रक्षण करणे म्हणजे परधर्माचा द्वेष करणे असे वाटते पण स्वधर्माचे रक्षण म्हणजे परधर्माचा द्वेष करणे नव्हे संघाच्या कार्यपध्दतीत पंथोपंथ, जातीय मतभेद इ. भानगडी उपस्थित होवू शकत नाहीत. संघ संपूर्ण समाजाचा एकात्वाने विचार करणारा आहे.

ते म्हणतात, आम्हाला हिंदू धर्माबद्दल अभिमान आहे ज्यांना धर्म जागवायचा आहे. त्यांच्यात धर्मावरच हल्ल्याचा प्रतिकार करण्याची शक्ती असावयास पाहिजे. हा देश हिंदूस्थान म्हणून ओळखला जातो. हिंदूत्व हा या राष्ट्राचा प्राण आहे. म्हणून या देशाची धर्माची व संस्कृतीची सर्वतोपरी जबाबदारी हिंदुना पार पाडता यावी यासाठीच आरएसएसची स्थापना केली आहे. समाजाचा तेजोभंग करुन समाजाचे पौरुष जागविता येत नाही. आम्ही हीन, पतित, नालायक लोक आहोत आमचे धार्मिक आचरण रानटी आहे असे सातत्याने सांगीतले गेल्यास धर्म रक्षणाची प्रेरणा निर्माण होवू शकत नाही. पराक्रम व पौरुष जागविण्यासाठी तशाच कथा सांगाव्या लागतात. हा मनुष्याचा स्वभावधर्म आहे. म्हणून आजही संघात आम्ही पूत्र अमृताचे मनुष्य तु बडा महान है | यासारखी आत्मतेज प्रकट करणारी गीते गायली जातात.

धर्मसुधारणा करण्याची आपली एक परंपरा आहे. आपला एक सनातन मार्ग आहे.शंकराचार्य, मध्वाचार्य, तुकाराम ते आधूनिक काळातील गाडगे महाराज अशी आहे. यासंबंधी ज्ञानदेवाचे जीवन मार्गदर्शक ठरेल. त्यावेळच्या धर्ममार्तंडानी ज्ञानदेवादी भांवडांना जाती बहिष्कृत केले. मुंजीचा अधिकार नाकारला. अशावेळी त्याच्यापुढे दोन मार्ग होते. १. प्रचलीत हिंदू धर्माचा त्याग करणे, २. संन्याशी बनून हिमालयात निघून जाणे. पण यापैकी एकही गोष्टी ज्ञानेदव भावंडानी केली नाही. धर्मसुधारणेसाठी ते समाजात राहिले. प्रचलित रुढीचे त्यांनी विडंबन केले नाही. मुंज व्हावी म्हणून शुध्दीपत्र आणण्यासाठी ते पैठणला गेले नंतर ज्ञानदेवांनी संस्कृतातील ज्ञान मराठीत आणले ज्ञानेश्वरीची रचना केली. हिंदू धर्म कोणता याचे विवरण केले. देव मुर्तीत नाही, दगडात नाही, वृतवैक्ल्य, तिर्थाटनात नाही याची अनुभूती असतानाही पांडूरंगाची आराधना केली. सामान्य लोकव्यवहाराला धरूनच ते जगले व धर्मसुधारणाबाबत अदभूत क्रांती केली. येथे जाती वर्ण, अवघेची गा अप्रमाण अशी सिंहगर्जना केली. स्त्रियांना समान अधिकार दिले. प्राकृत मराठी ही धर्मशास्त्राची भाषा केली.

डॉ. हेडगेवारांनी हेच कार्य केले. व्यक्तीगत आणि कौटुंबिक, धार्मिक रुढी बंधनात अडकून पडलेल्या सामान्य हिंदूना त्यांनी बाहेर काढले. हिंदू धर्म हाच राष्ट्रधर्म आहे. हे त्यांच्या मनावर बिंबवले. समाजाची सेवा हिच परमेश्वराची सेवा आहे. हे त्याच्या मनावर बिंबवले "आमचा स्वदेश भूवनजयामध्ये वास" त्यांनी घडविलेला स्वयंसेवक असेतू हिमाचल भारतभूमी हेच माझे निवासस्थान मानतो. तो सर्व हिंदू समाजाशी भावनिकदृष्टया चटकन एकरुप होतो. म्हणूनच तो स्वयंस्फूर्तीने मोर्वि नदीचा जलप्रलय असो की आंध्र प्रदेशातील वादळ असो की किल्लारीचा भूकंप असो मदतीसाठी धावून

जातो. हिंदू समाजाच्या सर्व समस्यावर हिंदूसंघटना हाच उपाय आहे. परंतु धर्मसुधारणा कारण्यासाठी डॉक्टरांनी संघ सुरु केला नाही पण डॉक्टरांच्या संघ कार्याचा एक स्वाभाविक परिणाम धर्मसुधारणा घडवतो.

### गुरुजींचे अजोड नेतृत्व -

डॉक्टरांचा मृत्यू १९४० साली झाला तेव्हा ते अवघे ५१ वर्षाचे होते. त्यांनी आपल्या कार्याची धुरा माधव सदाशिव गोळवळकर यांच्यावर सोपवीली. गुरुजींच्या काळात संकटे खुप आली देशाच्या इतिहासाने अनेक नागमोडी वळणे घेतली. १९४२ चे चले जाव हे गांधीजीचे आंदोलन कसल्याही तयारीविना सुरु केलेले भावनोत्कट आंदोलन होते. सर्वांचे सहकार्य घेवूनच करा अथवा मरा या निकराचे आंदोलन सुरु करावयाचे होते असे गुरुजींचे मत होते. ब्रिटीशांनी गांधीजीसह सर्व जननेत्यांना तुरुंगात डांबले. मग वाटेल त्या मार्गाने लोकांनी हे आंदोलन चालविले. ते उत्स्फूर्त होते परंतु विस्कळीत होते. चिमूरला उग्रता प्रकट व्हावी आणि चंद्रपुरला सौम्यता दिसावी अशी दृश्ये जागोजागी दिसली म्हणूनच अखिल भारतीय स्तरावरचे हे आंदोलन केवळ दोन महिन्याच्या आत थंड पडले. आंदोलन दिशाहीन होते. या आंदोलनात संघाचे स्वयंसेवक सामील झाले. आंदोलन कर्त्यांना संघाच्या लोकांनी आश्रय दिला. जयप्रकाश नारायण दिल्लीचे संघचालक लाला हंसराज गुप्ता याच्या घरी राहिले औंधचे संघचालक श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी नाना पाटलांना सर्वतोपरी सहाय्य केले. पण संघ त्यापासून अलिप्त राहिला.

१९४५ साली दुसरे महायुध्द संपले. इंग्लंडचा विजय झाला पण हा विजय मृतावर मरणासन्नाचा विजय होता. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद फौज म्हणजे इंग्रजाच्या सेनेत असणाऱ्या सैनिकांची बंडखोरी होती. ज्यांच्या भरोस्यावर साम्राज्य तेच बंडखोर झाले हे ध्यानात येताच ब्रिटीशांनी आपल्या वसाहतीना स्वातंत्र्य देण्याचे घोषीत केले आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य देण्याचे त्याने घोषीत केले. पण आपली एक महाभयंकर अट लादून इंग्रजाने भारताचे तुकडे करुन स्वातंत्र्य दिले. या फाळणीच्या कृतीने भयंकर रक्तपात घडला. एखाद्या महायुध्दातही जेवढी प्राणहानी झाली नसेल तेवढी प्राणहानी हे स्वातंत्र्य मिळवताना झाली.

कोटयावधी लोक निर्वासीत बनून भारतात आले. मुस्लीम अत्याचाराला बळी पडलेल्या निर्वासीतांची व्यवस्था लावण्याच्या कामाला संघाने जुंपुन घेतले. त्यासाठी स्वयंसेवकानी प्राणाची बाजी लावली. संघ प्रथमच लोकांच्या नरजेत भरला. सर्वत्र संघाची प्रशंसा होवू लागली. त्यामुळे सत्ताकांक्षी कॉंग्रेसवाले संघास फॅसिस्ट म्हणू लागले. हिंसक म्हणू लागले. मुस्लीमाचे कर्दनकाळ म्हणून वर्णन करु लागले. संघावर बंदी घाला अशी आवाहने वृत्तपत्रे करु लागली. उ. प्रदेशाचे कॉंग्रेस सचिव गोविंद सहाय यांनी पुस्तीका प्रकाशित करुन संघ बंदीची जाहीर मागणी केली. संघद्वेष्टया मंडळीना गांधीजीच्या हत्याची संधी मिळाली. ३० जाने १९४८ गांधी हत्या झाली. हत्या करणारी व्यक्ती हिंदूत्वनिष्ट आहे असे समजताच संघावर बंदी घालण्यात आली. हजारो लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. सरदार पटेल यांनी संघाची भेट घेतली संघाने कॉंग्रेसमध्ये सामील व्हावा असा आग्रह धरला. परंतु गुरुजीनी कोणत्याही अपमानास्पद अटी मान्य केल्या नाहीत त्यांनी सत्याग्रह केला साठ हजार लोकांना कारावास घडला. या संघर्षात गुरुजी विजयी झाले. संघावरील बंदी उठली.

संघ पुन्हा सुरु झाला. संघाचे ध्येय काय त्याचे स्वरुप कसे असावे अशी चर्चा सुरु झाली. संघाचे पहिले उद्दिष्ठ स्वातंत्र्य प्राप्त करणे होते ते साध्य झाले. आता संघाची गरज काय संघावरील बदीं उठल्यानंतर चारच महिन्यात स्वतंत्र भारताची घटना तयार झाली दोन महिन्यांनी तिचा अंमल सुरु झाला दोन वर्षानी निवडणूका घेण्याचे जाहीर झाले. संघाने आता राजकीय पक्षात रुपांतर केले पाहिजे. एवढयात केंद्रीय मंत्रीमंडळातुन राजीनामा देवून डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी बाहेर आले. त्यांनी नवीन पक्ष स्थापण्याचे जाहीर केले. ते गुरुजींकडे आले गुरुजीने त्यांना काही कार्यकर्ते दिले. याच्यापूर्वी विद्यार्थी जगतातील साम्यवादाच्या प्रभावाचा आवर घालून राष्ट्रवादाचे बिजारोपन करणाऱ्या विद्यार्थी परिषदेची स्थापना झाली. काही सेवा कार्य ही सुरु झाली. पण सर्व कार्ये संघाचे पूरक कार्ये आहेत. पर्याय नाहीत. गुरुजी म्हणतात मला उत्तम शाखा हवी, तीच राष्ट्र निर्माणाचे कार्य करेल या शाखेच्या पध्दतीतुन चारित्रसंपन्न आणि निरपेक्षपणे देश सेवा करणारे कार्यकर्ते तयार होतील. गुरुजींचा हा मौलिक विचारानुसार संघाने आजपर्यंत मार्गक्रमण केल्यामुळे तो आज राष्ट्रीय जीवनाचा केंद्रस्थानी आला आहे.

गुरुजी म्हणतात संघ राष्ट्राचे प्रतिक आहे. राष्ट्र जीवनाचे प्रतिक आहे. समाजजीवन व्यामिश्र असणे त्याची अनेक क्षेत्रे व उपक्षेत्रे असतात. राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण ही त्या जीवनाची विविध क्षेत्रे आहेत. विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, महिला, कामगार, वनवासी इ. त्या त्या क्षेत्राचे घटक आहेत. पण या सर्वांतून श्रेष्ट असे राष्ट्र आहे. संघाला संपूर्ण समाजाचे सघंटन अभिप्रेत आहे. समाज जिवनाची ही सर्व क्षेत्रे राष्ट्रहिताच्या भावनेने राष्ट्रहिताचे लक्ष समोर ठेवून चालले पाहिजेत. संघाचे कार्यकर्ते या सर्व क्षेत्रात जातील.

थोडक्यात संघ बंदीनतंर (१९४८) गोळवळकर गुरुजी व बाळासाहेब देवरस या उभयतांनी संघाचा संघ परिवार करण्याची योजना आखली व सृजनशिलतेनी ती आमलातसुध्दा आणली. त्यामुळे संघ बहुध्रुवी होवून त्याची हॉरिझंटल डेव्हलपमेंट झाली. आर. एस. एस. (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व राष्ट्र सेविका समिती) नेटवर्कमध्ये खालीत मास ऑर्गनायझेशचा समावेश होतो.

## निष्कर्ष आणि समारोप

२० शतकाच्या तीस-या दशकाच्या मध्यापासून भारतीय राजकारणांत हिंदूचे राजकीय संघटन घडवून आणण्याची प्रक्रिया सुरू झाली. स्वा. सावरकर आणि इतर प्रभृती यांनी प्रारंभी सशस्त्र क्रंातीचे राजकारण करून ब्रिटीश सत्तेला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिलेली होती. हिंदूचे राजकीय संघटन हे स्वा. सावरकराचे जीवन उद्यिष्ठ होते. या हेतूनेच त्यांनी १९२४ साली हिंदूत्व या ग्रंथाची निर्मीती केली. या ग्रंथातील मुलभूत विचारसरणीवर अधारीत त्या विचारसरणीला मुर्त स्वरूप देण्याच्या हेतुनेच रा. स्व. संघाची निमलष्करी संघटना डॉ. हेडगेवाराच्या नेतृत्वाखाली निर्माण झ ाली. स्वातंत्र्यपुर्व काळातील स्वा. सावरकराचे हिंदुत्ववादी राजकारण आणी राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे राजकारण सर्वज्ञात आहेच. १९८० नंतरच्या भारतीय राजकारणाचा आढावा घेत असताना भारतीय जनता पक्ष, संघ आणी संघ परिवाराच्या राजकारणाची चिकित्सा केल्यास हिंदूत्ववाद्याना अभिप्रेत असलेल्या हिंदू राष्ट्रवादाचे ध्येय साध्य करता आले आहे काय? संघ आणि संघ परिवारातील विविध संस्थाचे कार्य हे राष्ट्रव्यापी आणी देशव्यापी होवू शकते काय? संघाला अभिप्रेत असणारा हिंदूत्ववाद हा भारतीय समाजातील विशीष्ठ वर्णापुरता आणी त्यांच्या हितसंबंधापर्यंत मर्यादीत राहिलेला आहे. संघाला अभिप्रेत असलेला हिंदू समाज कोणता? भारतीय समाजातील अस्पृश्य, अंत्यज आणी इतर बहूजन समाजाला त्यांना मान्य असलेल्या वर्णीय व्यवस्थेत कोणता सामाजिक दर्जा असणारा असेल? संघाचे सांस्कृतिक कार्य आणी बौध्दिके ही पुज्य गोळवळकर गुरूजीच्या विचारधनाशी संबंधीत आहेत. हे जाणवते. या अनुषंगाने प्रश्न निर्माण होतो तो हिंदूत्ववाद्याना अभिप्रेत असलेल्या हिंदू राष्ट्रवादाचे व हिंदू राष्ट्राचे काय?

वस्तुतः भारताची फाळणी एक दुःखद, युगप्रवर्तक घटना आहे हे मान्य करावे लागेल. राष्ट्र या संकल्पनेचा विचार होत असताना विशिष्ठ भौगोलिक प्रदेशांत कायम वास्तव्य करून राहणारा, एकात्म भावनेने जीवन जगणारा मानवी समूह आणि मानवी समूहातील प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून केंद्रस्थानी कल्पून त्याला माणसाचे जीवन कसे जगता येईल या आधुनिक विचाराने प्रेरीत झालेला समाज असा विचार करावा लागेल. भारतीय उपखंडातील स्वातंत्र्यपुर्व काळातील हिंदू - मुस्लिम राजकारण आणि स्वातंत्र्योत्तर भारताचे धर्मनिरपेक्ष राजकारण व ८० च्या दशकानंतर अवतरलेले धार्मिक उन्मादाचे राजकारण भारतीय राष्ट्रवादाला, राष्ट्रवादाच्या जडणघडणीला कसे हानीकारक ठरलेले आहे, हे काळाने सिध्द केलेले आहे.

स्वातंत्र्य चळवळीतील मुस्लीम लीगचे आणि मुस्लीम नेतृत्वाचे योगदान काय? वस्तुतः मुस्लीम लीगचे स्वातंत्र्यपुर्व काळातील राजकारण दबावगटाचे राजकारण आहे. कॉग्रेस नेतृत्वाने आणि इतराची स्वातंत्र्यासाठी कारागृहाच्या आणि इतर स्वरूपाच्या शिक्षा भोगल्या. चळवळी, आंदोलने, सत्याग्रह हे सर्व स्तरावर कॉंग्रेसने घडवून आणली. आणि दबावगटाचे राजकारण करून धर्माच्या आधारे लीगने पाकिस्तान मिळविले ही वस्तुस्थिती आहे. याचा हिंदूत्ववाद्याना राग आहे. अखंड भारताच्या नावे संघ आजही घोषणा देताना दिसतो. पण या निमीत्ताने काही प्रश्न - उपप्रश्न निर्माण होतात, हे संघ सोयीस्करपणे विसरतो. अखंड भारत निर्माण होणे त्या काळी शक्य होते का? जर ती शक्यता होती तर फाळणीच्या विरोधात संघाने आपली शक्ती उभी केली काय? फाळणीच्या निमीत्ताने संघाला एक मोठे वरदान मिळाले आहे. या निमित्ताने हिंदूच्या मनांत मुस्लीमाविषयी व्देष निर्माण करणे संघाला शक्य झालेले आहे. फाळणीच्या विरोधात सावरकरानी एकाकी लढत दिली जीला इतिहासांत तोड नाही.

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १ | आंबेडकर | धनंजय कीर. |
| २ | समरसता - हेडगेवार | रमेश पतंगे. |
| ३ | मी, मनु आणि संघ | रमेश पतंगे. |
| ४ | शिवसेना - निमफॅसिस्ट, मोहिनी विद्येचा प्रयोग | सुहास पळशीकर - सातारा - आंबेडकर ॲकॅडमी - सातारा. |
| ५ | सावरकरांचा बुध्दीवाद आणि हिंदूत्ववाद | शेषेराव मोरे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | सावरकरांच्या समाजक्रांतीचे अंतरंग | शेषेराव मोरे. |
| ७ | हिंदी संस्कृती आणि अंहिसा | धर्मानंद कोसंबी. |
| ८ | सावरकरांचे समाजकारण: सत्य आणि विपर्यास | राजहंस प्रकाशन, पुणे. |
| ९ | पुरोहित वर्ग वर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास | मुरंजन सुमन, प्रज्ञा पाठशाळा, वाई. |
| १० | मध्ययुगीन भारताचा इतिहास आणि जमातवादी दृष्टिकोन | हरबन्स मुखीया, अनुवाद बेडेकर लोकवाङ:मय गृह, मुंबई. |